दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ४५ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.११ डिसेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस क्शन मोडमध्ये

# केंद्राचा पुरेपुर वापर राज्याच्या प्रगतीसाठी करा, अधिकाऱ्यांना दिल्या सूचना



**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर आता देवेंद्र फडणवीस क्शन मोडमध्ये आले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे अतिरिक्त सचिव, प्रधान सचिव आणि सचिव यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. पारदर्शकता, गतिशीलता आणि प्रामाणिकपणा यावर अधिक भर देण्याच्या सूचना फडणवीस यांनी केल्या आहेत. याचसोबत केंद्र सरकारचा पुरेपूर वापर राज्याच्या प्रगतीसाठी करून घ्या, अधिक समन्वय आणि पाठपुराव्याची व्यवस्था करण्याचे देखील त्यांनी निर्देश दिले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अधिकाऱ्यांना सूचना देताना म्हणाले, केंद्र सरकारचा पुरेपूर वापर राज्याच्या प्रगतीसाठी करून घ्या, अधिक समन्वय, पाठपुराव्याची व्यवस्था निर्माण करा. यासाठी दिल्ली येथे महाराष्ट्र सदनाच्या माध्यमातून स्वतंत्र कक्ष उभारा. वॉररूम आणखी कार्यक्षम करा. कोणते प्रकल्प त्यात असले पाहिजे, याची नव्याने रचना मुख्य सचिवांनी करावी. पहिली बैठक डिसेंबर अखेरीस व्हावी. एक वॉररूम पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी आहेच, पण दुसरी वॉररूम आता केंद्र आणि राज्य सरकारच्या फ्लॅगशिप योजनांसाठी असेल. त्यातून सर्वसामान्य लोकांपर्यंत लाभ गतीने पोहोचले पाहिजे.पुढे देवेंद्र फडणवीस म्हणाले, जनता दरबार, लोकशाही दिन कार्यक्रम वेगाने हाती घ्या. हे कार्यक्रम सुरू झालेच पाहिजे, ते तळागाळात नेले पाहिजे. आपले सरकार पोर्टल पुन्हा नव्याने पूर्ण क्षमतेने चालवा. पालक सचिवांनी आपल्या जिल्ह्यात प्रवास तत्काळ सुरू करावे. आपल्या अनुभवाचा फायदा त्या-त्या जिल्ह्यांना करून द्या, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सचिवांना सांगितले आहे.

### महाराष्ट्र नंबर १ वर आहे म्हणून थांबू नका

**देवेंद्र फडणवीस म्हणाले, कर्मचाऱ्यांच्या तक्रारींकडे प्राधान्याने लक्ष द्या. त्यांचा सचिवांशी थेट संवाद आणि त्यातून त्यांच्या समस्यांचे निराकरण करा. नवीन नियुक्त कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण तातडीने घेऊन त्यांना त्यांच्या जिल्ह्यात पदस्थापन द्या. महाराष्ट्र हे असीमित ताकदीचे राज्य आहे, आपण नंबर १ वर आहोत म्हणून थांबू नका. जुनी पुण्याई असली तरी नवी पुण्याई पुन्हा मिळवली पाहिजे. तंत्रज्ञानाचा महत्तम वापर करा. १०० दिवसांचे कार्यक्रम प्रत्येक विभागाने सादर करावा, अशा सूचना देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत.**

### लोकांना घरबसल्या सेवा मिळतील याकडे लक्ष द्या

**देवेंद्र फडणवीस म्हणाले, वेगवेगळ्या विभागाचे पोर्टल अपडेट करून ते अधिक प्रभावी करा. त्यातून लोकांना शक्य तितक्या सेवा घरबसल्या लोकांना कशा मिळतील, यावर भर दिला पाहिजे. सर्व संकेतस्थळ आरटीआय फ्रेंडली करा. उत्कृष्ट काम करणाऱ्या विभागांना मंत्रिमंडळ बैठकीत सन्मानित करण्यात येणार असल्याचे देखील फडणवीस यांनी यावेळी सांगितले आहे.**

# वर्धा बसस्थानकावर एसटी कर्मचाऱ्यांची मनमानी आणि प्रवाशांशी अरेरावी








**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा बसस्थानकावर एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांकडून दारू पिऊन मनमानी आणि प्रवाशांशी अरेरावी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

संध्याकाळी ६.३० वाजल्यापासून रात्री ९ वाजेपर्यंत अनेक प्रवासी गाडीची वाट पाहत बसले होते. नियमांनुसार ५० प्रवासी असले की बस प्रवाशांसाठी उपलब्ध केली जाते. मात्र, कर्मचाऱ्यांनी एकाच बसमध्ये प्रवाशांना भरून पाठवण्याचा प्रयत्न केला. यावेळी कर्मचाऱ्यांनी महिलांशी अरेरावीच्या भाषेत संवाद साधला.

दैनिक सह्याद्रीचा राखणदारच्या टीमला प्रवाशांनी फोन करून माहिती दिल्यानंतर ते घटनास्थळी पोहोचले. कर्मचाऱ्यांशी विचारपूस केली असता, संबंधित कर्मचाऱ्याने आपले नाव आणि ओळखपत्र देण्यास नकार दिला. चौकशी विभागात विचारणा केल्यावरही कोणतेही जबाबदार अधिकारी समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत.

एक कर्मचारी दारूच्या नशेत प्रवाशांशी अरेरावी करत होता. त्याचवेळी त्या कर्मचाऱ्याच्या भावाने प्रवाशांना धमकावत, माझ्या भावाबद्दल काही बोलले तर घाव घालीन, असे वक्तव्य केले. या प्रकारामुळे प्रवासी भयभीत झाले.

घटनेनंतर वर्धा शहर ठाण्याचे ठाणेदार यांना माहिती दिली गेली. पोलिसांनी त्वरित मदतीसाठी धाव घेतली. मात्र, पोलीस गाडीच्या आवाजाने संबंधित कर्मचारी घटनास्थळावरून पळून गेला.

एसटी महामंडळाचे कर्मचारी प्रवाशांची सेवा करण्याऐवजी असे वर्तन करत असतील, तर प्रवाशांचे रक्षण कोण करणार?

वर्धा एसटी महामंडळाने संबंधित कर्मचाऱ्यांवर तत्काळ कठोर कारवाई करावी आणि प्रवाशांच्या सुरक्षेची हमी द्यावी, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे. पोलीस प्रशासनाकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून पुढील कारवाईची प्रतीक्षा आहे.

# स्मार्ट मीटर बसवणाऱ्यांना दिवसा स्वस्त वीज: ग्राहकांना प्रतियुनिट १ रुपयाची सूट

**वर्धा । प्रतिनिधी**

महावितरणने स्मार्ट प्रीपेड वीज मीटरच्या विरोधावर नियंत्रण मिळवण्यासाठी एक आकर्षक प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावानुसार, स्मार्ट मीटर बसवलेल्या ग्राहकांना दिवसा वीज सवलतीच्या दराने मिळणार असून, त्यांना प्रतियुनिट १ रुपयाची सूट दिली जाईल.

महावितरणने महाराष्ट्र नियामक आयोगासमोर बहुवार्षिक दर याचिका दाखल केली आहे, ज्यामध्ये स्मार्ट मीटर बसवलेल्या घरगुती ग्राहकांना तसेच सर्व ग्राहकांना 'टाइम ऑफ द डे' (टीओडी) टॅरिफचा लाभ देण्याची परवानगी मागितली आहे. जनसुनावणीनंतर आयोग या याचिकेवर निर्णय घेईल. सध्या औद्योगिक ग्राहकांना रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत १.५ रुपये प्रतियुनिट वीज दर सवलत मिळत आहे.

महावितरणचे म्हणणे आहे की, सौरऊर्जेचा लाभ स्मार्ट मीटर ग्राहकांना मिळेल, कारण सौरऊर्जा स्वस्त आहे आणि ते ३.२५ रुपये प्रतियुनिटच्या दराने उपलब्ध होईल. या योजनेमुळे ग्राहकांना १ रुपयाची प्रतियुनिट बचत होईल, असे महावितरणचे अनुमान आहे.




### ३.९८ लाख स्मार्ट मीटर बसवण्यासाठी कोटी रुपये खर्च

**राज्यात २६ हजार कोटी रुपये खर्चून २.४१ कोटी स्मार्ट प्रीपेड मीटर बसवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे ३ लाख ९८ हजार घरांमध्ये स्मार्ट मीटर बसवण्यात येणार आहेत. स्मार्ट मीटर पोस्टपेड आणि प्रीपेड दोन्ही सुविधांसाठी उपलब्ध असतील.**

# चंद्रपूर मनपाने नळ कनेक्शन दिले,पण पाणी नाही

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बाबूपेठ येथील सिद्धार्थ नगर, आंबेडकर नगर, लुंबिनी नगर बायपास रोड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर वार्ड मध्ये चंद्रपूर महानगरपालिका (मनपा) ने पाच ते सहा महिन्यांपूर्वी नळाचे कनेक्शन दिले, परंतु त्याला अजून एक थेंब पाणी येत नाही. यावरून नागरिकांनी तक्रार केली असून, दोन वेळा नळाचे बिल पाठविण्यात आले आहे. याबाबत महापालिकेच्या आयुक्तांना निवेदन दिल्यानंतर, ९ डिसेंबर २०२४ रोजी, मनपा चंद्रपूरचे अधिकारी बोरीकर यांना तिसरे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात प्रमुख सहभाग विजया भगत, ज्योती निमसरकर, यशोधरा उमरे, मंगला शेंडे यांचा होता.



# सकल हिंदू समाज एकवटला

## बांगलादेश हिंदुच्या समर्थनार्थ चंद्रपूरात न्याय यात्रा...

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बांगलादेशातील हिंदू, सिख, बौध्द, जैन, ख्रिश्चन या अल्पसंख्यांक समाजावर इस्लामिक अतिरेक्यांनी मागील अनेक महिन्यापासून अत्याचार सुरु केले. ज्यात हल्ले, हत्या, लुटमार, जाळपोळ आणि महिलांचा अमानुष छळ, हिंदू आणि अल्पसंख्यांकांच्या धर्मिक स्थळांची विटंबना सुरु केली आहे. या घटना रोखण्यासाठी योग्य ती पावेल उचलण्या ऐवजी सद्याचे बांगलादेश सरकार व इतर संबधित यंत्रणा मूक प्रेक्षक बनून राहिल्या आहेत. त्यांचा आवाज दाबण्यासाठी लोकशाही पद्धतीने आवाज उठवण्याचा अवलंब केला तेव्हा अन्याय आणि अत्याचाराचा एक नवीन टप्पा दिसून येतो आहे. हिंदुच्या अशा शांततापूर्ण आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या इस्कॉनचे संन्यासी पूज्य श्री चिन्मय कृष्ण दास जी यांना बांगलादेश सरकारने अटक करणे अन्यायकारक आहे.

या गंभीर प्रसंगी भारत सरकार व आंतरराष्ट्रीय संस्थांनी बांगलादेशातील पीडितांच्या पाठीशी उभे राहून ते एकटे नसून संपूर्ण जग त्यांच्या पाठीशी आहे हा भाव व्यक्त करण्याकरीता चंद्रपुरात मंगळवारी १० डिसेंबरला दुपारी २.३० वाजता भव्य न्याय यात्रा काढण्यात आली. या न्याय यात्रेत चंद्रपूर जिल्ह्यातून हजारोच्या संख्येने नागरीक महिला वर्ग उपस्थित होते. विविध समाजतील समाज बांधव, अल्पसंख्याक समाजातील धर्मगुरू, जेष्ठनागरिक , महिला वर्ग व ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर ,आ.किशोर जोरगेवार या न्याय यात्रेत सहभागी झाले होते. न्याय यात्रा हि गांधी चौक येथून निघून जिल्हाधिकारी कार्यालय येथे सांगता झाली. निवासी जिल्हाधिकारी यांना सकल हिंदू समाज, चंद्रपूर तर्फे निवेदन देण्यात देण्यात आले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक दीपक जी तामशेट्टीवार ,जिल्हा संघचालक तुषार जी देवपूजारी,तालुका संघचालक लक्ष्मण ओलालवार, नगर संघचालक रवींद्रजी भागवत, शीख समाजाचे चमकौर सिंग, बौद्ध समाजाचे धम्म् म भन्ते जी, इस्कॉन चे रमेश जी बिराजदार, स्नेहाताई मिसार, प्राजक्ता भालेकर ताई, अशोक जीवतोडे, शैलेश जी बागला, शवारकरी चे मेश्राम हे उपस्थित होते.






### सकल हिंदू समाजाच्या प्रमुख मागण्या

**बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराविरुद्ध तेथील सरकारला भारत सरकारकडून कठोर इशारा दिला जावा, मानवाधिकारवादी संघटनांनी हिंदू आणि अन्य अल्पसंख्याकावरील हल्ल्याची, अत्याचाराची दखल घेऊन हा मुद्दा राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर लावून धरावा, बांगलादेशातील हिंदूंच्या जीविताचे आणि संपत्तीचे रक्षण तसेच महिलांवरील अत्याचाराच्या घटनांना पायबंद घातला जावा, इस्कॉनचे साधू चिन्मय कृष्णदास यांची तुरुंगातून तत्काळ स-सन्मान मुक्तता करण्यात यावी, हिंदू कलाकार, व्यावसायिक, उद्योगपती, खेळाडू, राजकीय नेते तसेच हिंदू मंदिरांना सुरक्षा पुरविली जावी, बांगलादेशातील पाकिस्तानी जिहाद्यांच्या हस्तक्षेपाला पायबंद घालावा, संयुक्त राष्ट्रसंघात हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन व अन्य अल्पसंख्यकांवरील अत्याचाराचा मुद्दा उपस्थित केला जावा, बांगलादेशातील अल्पसंख्य समाजाच्या रक्षणाची मागणी करणाऱ्या देशोदेशीच्या विविध आंदोलनांना सुरक्षा प्रदान केली जावी, इत्यादी मागण्या यावेळी करण्यात आल्या.**


# बांग्लादेश भविष्यात डोळे वटारेल चीन-पाकिस्तानच्या पंक्तीतलाच

## हंसराज अहीरांनी २०१७ मध्ये केले होते वक्तव्य

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

तत्कालीन केंद्रीय गृह राज्यमंत्री पदावर असतांना हंसराज अहीर यांनी नोव्हेंबर २०१७ मध्ये 'देशाअंतर्गत सुरक्षा' या विषयावर असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्री ऑफ इंडिया द्वारा आयोजित परिषदेत बोलतांना चीन, पाकिस्तान सारखे बांग्लादेश सुध्दा देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत भविष्यात संभाव्य धोका ठरू शकतो असे अतिशय गंभीर विधान एकंदर परिस्थिती ओळखून केले होते.

बांग्ला देशातील हिंदुवर होत असलेले वाढते हल्ले, अन्याय व अमानुष अत्याचाराच्या पार्श्वभुमीवर हंसराज अहीर यांनी तेव्हा केलेले वरील वक्तव्य आज प्रत्यक्षात घडत आहे. बांग्लादेशातील भयावह परिस्थिती पाहता भारतापूढे फार मोठे आव्हान उभे झाले आहे. बांग्लादेशात हिंदुंचा अनन्वित छळ होत असून त्यांची घरे जाळली जात आहेत. त्यांच्या संपत्तीची लूट होत आहे. अमानुष अत्याचार, लुटपाट, जबरी धर्मांतरणासारखे प्रकार घडत असल्याने हिंदुवरील या अन्यायाच्या विरोधात भारतीय हिंदु व अन्य समाज दु:खी असून याचा प्रखर विरोध करीत अनेक हिंदुत्ववादी संघटना व अन्य सामाजिक संघटनाच्या माध्यमातून या अन्यायाविरोधात होणाऱ्या संपूर्ण देशभरात असंतोष व आक्रोश व्यक्त करीत निषेध आंदोलन होत आहेत.



# निवडणुकीचा जय पराजय मी मानत नाही;माझा विजय मी लोकांच्या डोळ्यात पहिलाय-अभिषेक कळमकर

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर :अहिल्यानगर येथे स्नेहमेळाव्यात बोलताना अभिषेक कळमकर म्हणाले की लोकशाहीतील जय पराजयाला मी घाबरत नाही. एका निवडणुकीत जरी आपला पराभव झाला असला तरी शहरातील जनतेने ८०००० चे मोठे मताधिक्य देऊन आपल्यावर विश्वास दाखवला त्याबद्दल मी नगरकरांचे आभार मानतो. विधानसभेची निवडणूक मी जीव पणाला लावून लढलो हे मला नगरच्या जनतेला सांगायचे आहे. मी व माझ्या सहकाऱ्यांनी शहरातील अवैद्य धंद्यांच्या विरुद्ध आवाज उठवला.माझ्या एक पण सहकाऱ्चे अवैध धंदे नाही हे मी ताठ मानेने सांगू शकतो. ही निवडणूक सोपी नव्हती अभिषेक पण यांना सोपा नव्हता, मी यांना निवडणुकीपूर्वी पण घाम फोडला, निवडणुकीत सुद्धा आणि भविष्यातही पण घाम फोडणार आहे.हा विजय धनशक्तीचा व ईव्हीएम मशिनीतून झालेल्या छेडछाडीचा विजय आहे.लोकशाही पद्धतीने निवडणूक होणे गरजेची होते सर्व यंत्रणा,मीडिया त्यांचेकडे होती.माझ्याकडे शहर विकासाचे व्हिजन आहे.काहीही झाले तरी जनता आपल्याच सोबत आहे याची खात्री मला या निवडणुकीतून आली आहे. महापौर पदाच्या काळात केलेल्या विकास कामांमुळे लोकांना नगर शहराचा विकास कोण करू शकतो हे नगरकरांना माहीत आहे त्यामुळे पुन्हा नगरकरांमध्ये जाऊन त्यांच्या समस्या आपल्या समजून त्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न येत्या काळात करणार आहे. सर्व समाजात शांतता बंधुभाव निर्माण करून लोकाभिमुख विकास कामे येत्या काळात शहरात करण्यात येतील. यात कधीही आपला आणि विरोधक असा भेदभाव करण्यात येणार नाही. मात्र या निवडणुकीत काही मंडळींनी धर्म, जाती, भेद निर्माण करत जनतेच्या मनात विष पेरले. आता मात्र आपल्याला याची दुरुस्ती करायची आहे. आपणही दादाभाऊ कळमकर यांचे वारसदार असून संघर्ष करून लढणे आपल्या रक्तात आहे.त्यामुळे आता पुन्हा नव्या उभारीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसमवेत पुन्हा जनतेत जाणार आहे.जनतेवर कार्यकर्त्यांवर व सर्वसामान्य नागरिकांवर झालेला अन्याय आपण कधीही सहन करणार नाही.यासाठी लढा द्यावा लागला तरी चालेल आपण मागे हटणार नाही.असे आश्वासन अभिषेक कळमकर यांनी उपस्थितांसमोर नगरकरांना दिले



## आमदार काशिनाथ दाते यांचा कामोठे येथे जल्लोषात सत्कार

**पारनेर । सुयश नरसाळे**

पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील विजयी आमदार काशिनाथ दाते यांचा शपथविधीनंतर कामोठे येथे भव्य स्वागत आणि पेढे तुळा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी पारनेरकर रहिवासी मित्र मंडळ, कामोठे, नवी मुंबई यांच्या वतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाला माजी सरपंच संतोष दादा मोरे आणि मोरे पाटील कुटुंबीयांसह नातेवाईक व पारनेरमधील ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती. सध्या कामोठे आणि नवी मुंबई परिसरात राहणाऱ्या पारनेरकर रहिवाशांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. आमदार काशिनाथजी दाते यांनी



उपस्थितांचे आभार मानत, पारनेर मतदारसंघाच्या विकासासाठी आपली कटिबद्धता व्यक्त केली. या सत्कार समारंभाने पारनेरकरांच्या एकजुटीचे दर्शन घडवले आणि एक आनंदाचा सोहळा साजरा करण्यात आला.

## गजानन भाऊरावजी सकसवळे यांचे निधन

**पुलगाव । प्रतिनिधी**

शिवाजी कॉलनी परिसरात राहणारे आणि सोरटा येथील मॉडेल



हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत गजानन भाऊरावजी सकसवळे (वय ५१) यांचे १० डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता नागपूर येथे उपचारादरम्यान निधन झाले.

२ डिसेंबर रोजी कर्तव्यावरून परत येताना त्यांच्या दुचाकीला मागून आलेल्या दुचाकीने धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले होते. प्राथमिक उपचारासाठी त्यांना पुलगाव व सावंगी येथून नागपूरला हलविण्यात आले होते. त्यांच्या पश्चात एक भाऊ, एक बहीण, पत्नी, दोन मुली आणि मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर ११ डिसेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## हजरत बाबा मस्तान शहा दर्ग्यावर आमदार समीर कुणावर यांना मंत्रिपद मिळावे,यासाठी प्रार्थना



**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

हजरत बाबा मस्तान शहा दर्ग्यावर चादर चढवून आमदार कार्यसम्राट समीर कुणावर यांना मंत्रिपद मिळावे, यासाठी मुस्लिम बांधव आणि युवा एकता मंडळाच्या वतीने प्रार्थना करण्यात आली.या कार्यक्रमात युवा एकता मंडळाचे अध्यक्ष राजू तेरांडे, नरेशजी पेठकर, जमील भाई खान जिलानी, सूर्या नरेश कटाने यांसह मंडळाचे सदस्य आणि मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्वांनी सामूहिक प्रार्थना करत समीर कुणावर यांना यशस्वी भविष्य आणि मंत्रिपद मिळावे, अशी आशा व्यक्त केली.कार्यक्रमादरम्यान सर्वधर्मीय एकतेचा संदेश देत धार्मिक स्थळांवरील अशा उपक्रमांतून सहकार्य आणि एकात्मतेचे दर्शन घडते, असे मत व्यक्त करण्यात आले.

## जलसंधारण कामांमुळे पाथर्डी तालुक्यातील करंजी गावात फळबागाचे प्रमाणात वाढ

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत जलसंधारणाची विविध कामे केल्याने शाश्वत जलसाठा उपलब्ध झाला असून फळबागांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले आहे.

पाथर्डी तालुक्यातील करंजी गाव हे बाजारपेठेचे गाव म्हणून ओळखले जाते. दिवसभरात दहा ते पंधरा हजार प्रवासी गावात ये-जा करतात. त्यामुळे गावकऱ्यांसोबत या प्रवाशांसाठीदेखील पिण्याचे पाणी आवश्यक असते. गावात फळबागांचे प्रमाणही अधिक अर्थात एकूण पिकांच्या ७५ टक्के आहे. या फळबागांसाठीदेखील मुबलक प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते.

पाण्याचे योग्य नियोजन करण्यासोबत पाणीसाठ्यात वाढ करण्याची आवश्यकता



लक्षात घेवून गावाने प्रधानमंत्री कृषी सिंचन योनजेअंतर्गत जलसंवर्धनाची विविध कामे हाती घेतली. जलस्रोतांमधील गाळ मोठ्या प्रमाणात काढण्यात आला आणि आवश्यक तिथे दुरूस्तीची कामे करण्यात आली. गाळ काढून परिसरातील शेतात टाकण्यात आल्याने शेतीसाठी त्याचा फायदा झाला. गावात पाणलोट विकास समितीमार्फत ४ ठिकाणी सिमेंट नाला बांध दुरुस्ती आणि १९ सामुहीक शेततलावाची कामे घेण्यात आली. याशिवाय ३ मातीनाला बांध, ८ चेक डॅम, समतल चर, संयुक्त गॅबियन, सलग समतल चर अशी ३९ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या कामांवर १ कोटी ३४ लाख रुपये खर्च करण्यात आले. या सर्व कामांमुळे गावातील पाणीसाठा वाढण्यास मदत झाली.

## खा.निलेश लंके यांचेकडून काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू व चष्मा वाटप शिबिरांच

**पारनेर । प्रतिनिधी**

खा. निलेश लंके व राणी लंके यांच्या संकल्पनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू व चष्मा वाटप शिबिरांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बाबाजी तरटे, निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुदाम पवार यांनी सांगितले.

शरद पवार यांच्या दि. १२ डिसेंबर रोजी पार पडणाऱ्या वाढदिवशी या शिबिराचे उदघाटन होणार असून दि.५ जानेवारी २०२५ पर्यंत विविध गावांमध्ये ही शिबिरे घेण्यात येणार असल्याचे राष्ट्रवादी महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष सुवर्णा धाडगे, युवतीच्या तालुकाध्यक्ष पुनम मुंगसे यांनी सांगितले. अलिकडे नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने




एक सुसज्ज रुग्णवाहिका जनतेच्या सेवेत रुजू करण्यात आली आहे. या रुग्णवाहिकेमध्ये नेत्र तपासणीसंदर्भातील अद्यावत उपकरणे असून तज्ञ डॉक्टर रूग्णांची तपासणी करून गरजूंना चष्याचेही वितरण करण्यात येणार असल्याचे राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष लकी कळमकर यांनी सांगितले.विधानसभा निवडणूकीपूव राणी लंके यांच्या संकल्पनेतून आरोग्य यज्ञाचे आयोजन करण्यात येऊन महिलांच्या ब्रेस्ट कॅन्सरची तपासणी करण्यात आली होती. या शिबिराचा हजारो महिलांनी लाभ घेतला होता. ब्रेस्ट कॅन्सर तपासणी बरोबरच आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरालाही गावोगावी मोठा प्रतिसाद मिळाला होता. आता नेत्र तपासणीच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस व नीलेश लंके प्रतिष्ठान पुन्हा एकदा सामाजिक दायित्व पार पाडणार आहे. या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन कारभारी पोटघन, बाळासाहेब खिलारी यांनी केले आहे.

## नियमबाह्य खरेदीखत रद्द होण्यासाठी जागरण गोंधळ घालण्याचा इशारा-अरुण रोड

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर : श्रीगोंदा तालुक्यातील म्हसणे सुलतानपूर येथील शेत जमिनीवर झालेले नियमबाह्य पलोटिंगचे खरेदीखत समक्ष पंचनामा करून रद्द करण्याच्या मागणीसाठी उपोषणानंतर प्रशासनाच्या वतीने आश्वासन देण्यात आले होते.हे आश्वासन पाळले नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने २३ डिसेंबर रोजी जागरण गोंधळ आंदोलन करण्याचा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

तालुक्यातील म्हसने सुलतानपूर येथील नियमबाह्य प्लोटिंग करून खरेदीखत झाल्याने ते रद्द करण्याबाबत संघटनेच्या वतीने दि. ७ ऑक्टोंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय ,विभागीय आयुक्त नाशिक यांना पत्र व्यवहार करून २१



ऑक्टोंबर रोजी उपोषण करण्यात आले होते. जिल्हाधिकरी गृहविभागाने सहजील्हा निंबधक वर्ग १ यांना पत्र दिले होते.या पत्रानव्ये उपोषणापासून परावृत्त करण्यात आले. आज अखेर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पत्रव्यवहार करून देखील सहजिल्हा निंबधक वर्ग १ यांनी कोणतीही कारवाई केली नाही .असा आरोप करण्यात आला आहे असे निवेदनात म्हटले आहे

## भारत सरकारने तातडीने पावले उचलून बांग्लादेश मधील हिंदू धर्मियांना दिलासा द्यावा-जयश्रीताई थोरात

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील संगमनेर येथे बांग्लादेश मध्ये हिंदू धर्मीयांवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ प्रांताधिकारी कार्यालय येथे काँग्रेस व विविध समाजसेवी संस्थांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

हिंदू धर्माने समस्त जगाला मानवतेचा धर्म शिकवला आहे. अत्यंत सहिष्णू असणाऱ्या हिंदू धर्माबाबत बांग्लादेशमध्ये मात्र काही कट्टरतावादी धार्मिक द्वेषभावना निर्माण करून तेथील स्थानिक हिंदूंचा छळ करत



आहेत. याचा आम्ही तीव्र निषेध करीत आहोत. बांग्लादेशातील आध्यात्मिक गुरु चिन्मय कृष्णदास यांना नुकतीच अटक करून त्यांना तुरुंगात डांबले आहे. तर अनेक हिंदूंना लक्ष करून त्यांना मानसिक त्रास दिला जात आहे. या विविध घटनांमुळे बांग्लादेश मधील अल्पसंख्यांक हिंदू बांधव हा भयभीत आहे.जगामध्ये कुठेही हिंदू धर्मीय किंवा अल्पसंख्यांक धर्मीयांवर होणारा अत्याचार हा अत्यंत चुकीचा असून मानवता धर्म जोपासण्यासाठी महाराष्ट्र व भारत सरकारने तातडीने पावले उचलून बांग्लादेश मधील हिंदू धर्मियांना दिलासा द्यावा अशी मागणी आम्ही करत आहोत. या वेळी संगमनेर येथील सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते

## श्री दत्त पादुकांचे कोल्हार येथे स्वागत

**अहिल्यानगर । गणेश सोमवंशी**

कोल्हार : श्री नवनाथ कथाकार हरेशजीं गिरी महाराज यांनी श्री क्षेत्र गाणगापूर येथील निर्गुण मठात अभिषेक करून नंतर कडगंजी येथील सायन देव मंदिर तसेच श्रीक्षेत्र अक्कलकोट व श्री क्षेत्र पंढरपूर येथे भेट देऊन आणलेल्या श्री दत्त पादुकांचे कोल्हार येथे स्वागत करण्यात आले कोल्हार येथील प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ.रमेश वाव्हळ यांच्या निवासस्थानी श्री दत्त पादुका दर्शनासाठी ठेवण्यात आल्या होत्या. दिंडोरी तालुक्यातील खेडगाव येथील श्री विजय डोखळे व ड. राजेंद्र डोखळे यांच्या वस्तीवरील श्री दत्त मंदिरात या पादुका विधिवत पूजन करून स्थापित करण्यात येणार आहे. श्री गुरुदेव दत्त जयंती उत्सव निमित्त दररोज सायंकाळी ७ ते १० या वेळेत श्री नवनाथ कथाकार



श्री हरेशजी गिरी महाराज यांची संगीतमय नवनाथ कथा पार पडणार आहे अशी माहिती राजेंद्र ढोकळे यांनी दिली यावेळी श्री वाव्हळ परिवारासह भाविकांनी पादुकांच्या दर्शनाचा लाभ घेतला, याप्रसंगी वाव्हळ परिवारातील सदस्यांनी श्री हरीश जी गिरी महाराजांसह ड. राजेंद्र डोखळे, विजय डोखळे, कुसुमअक्का ताई डोखळे तसेच मधुरा सचिन डोखळे यांचा सत्कार केला.याप्रसंगी डॉ. वाव्हळ, शोभा वाव्हळ, डॉ. विशाल वाव्हळ, पुजा वाव्हळ, विजय डेंगळे, पांडुरंग जोशी, आरती जोशी पत्रकार प्रमोद जी कुंभकर्ण, सह्याद्री राखणदार या दैनिकाचे चे वार्ताहार गणेश सोमवंशी उपस्थित होते

## इलेक्शनमध्ये दिल्या मोठ्या घोषणा, पण साखर कारखाने कधी सुरू होणार

**सोलापूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील निवडणूक वातावरण निवळत असताना, मतदारांनी निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनांकडे पाहून निराशा व्यक्त केली आहे. चार साखर कारखाने-दोन सहकारी आणि दोन खासगी-सध्या बंद अवस्थेत असून, तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या ऊसाची वाहतूक शेजारच्या तालुक्यातील कारखान्यांपर्यंत करावी लागत आहे.

तालुक्यात प्रचंड ऊस उत्पादन होत असूनही कारखान्यांच्या बंद स्थितीमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. ही परिस्थिती तालुक्यासाठी खेदजनक आणि अपमानास्पद मानली जात आहे. विशेष म्हणजे, प्रत्येक कारखानदार राजकीय सत्तेच्या जवळ असूनही कारखाने सुरू करण्यासाठी कोणीही पुढाकार घेताना दिसत नाही.



लोकांना निवडणुकीदरम्यान आश्वासनांची झूल दाखवणाऱ्या नेत्यांवर नाराजी व्यक्त होत आहे. बड्या बड्या घोषणा केल्या, पण साखर कारखाने कधी सुरू करणार? असा सवाल आता गल्लोगल्ली उपस्थित केला जात आहे. शेतकऱ्यांच्या आणि बाजारकऱ्यांच्या या आर्त हाकेला उत्तर देण्यासाठी स्थानिक नेते आणि कारखानदार तयार आहेत का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# आरोपीचा पाठलाग करताना थरार पोलिसही पडला विहिरीत; दोघांचीही सुखरूप सुटका

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सांगवी (ता. संगमनेर) येथे खुनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यातील आरोपीचा पाठलाग पोलिसाने केला. दोघेही विहिरीत पडल्याने हा पाठलाग थांबला.या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी धाव घेत दोघांनाही विहिरीतून सुखरूप बाहेर काढले आहे. विहिरीत पडल्याने दोघेही जखमी झालेले आहेत.



खुनाचा प्रयत्न गुन्ह्यातील प्रशांत शांताराम गागरे (वय ३२, रा. अंभोरे) हा आरोपी गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून पसार होता. तेव्हापासून त्याच्या मागावर पोलिस होते. पण तो पोलिसांना गुंगारा देत होता. गागरे हा शुक्रवारी रात्री सांगवी गावात आल्याची माहिती गुप्त खबऱ्यामार्फत तालुका पोलिस ठाण्याच्या विशेष पथकाला मिळाली.

त्यानंतर पोलिस हेडकॉन्स्टेबल आशिष आरवडे, अमित महाजन, पोलिस नाईक सचिन उगले, पोलिस कॉन्स्टेबल बाबासाहेब शिरसाठ हे सर्वजण गागरे याला पकडण्यासाठी सांगवी येथे गेले होते. पोलिसांनी सापळा लावल्याची चाहूल आरोपीला लागताच त्याने पळ काढण्यास सुरवात केली. या वेळी गागरे याने पोलिस हेडकॉन्स्टेबल महाजन यांना धक्का मारून तो अंधाराच्या दिशेने पळून गेला.याच वेळी पोलिस नाईक सचिन उगले यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता त्याचा पाठलाग केला. मात्र अंधारासह विहिरीचा अंदाज न आल्याने एका विहिरीत दोघेही पडले. विहिरीत पाणीही भरपूर होते. यावेळी दोघांनीही मदतीसाठी आरडाओरड केली. या दोघांच्याही आरडाओरडीमुळे पथकातील पोलिसही घाबरून गेले. त्यांनी आवाजाच्या दिशेने धाव घेतली. परंतु ते दिसून येत नव्हते.

या वेळी काहींना विहीर दिसून आली. त्यात डोकावले असता दोघेजण दिसून आले. त्यानंतर पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने आरोपीसह पोलिस कर्मचाऱ्याला विहिरीतून सुखरूप बाहेर काढले. दोघेही जखमी झालेले आहेत.

या दोघांनाही किरकोळ दुखापत झाली असून, त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले आहेत. उगले यांच्या कामगिरीची तालुक्यासह जिल्हाभर चर्चा सुरू असून, त्यांचे अभिनंदन होत आहे.

आरोपी प्रशांत गागरे हा पोलिस अमित महाजन यांना धक्का मारून पळून गेला होता. मात्र आपल्या जिवाची पर्वा न पोलिस नाईक सचिन उगले यांनी क्षणाचाही विलंब न करता त्याचा पाठलाग सुरू केला. दोघेही खोल विहिरीत पडले. दरम्यान गागरे गेल्या काही दिवसांपासून पसार होता. मात्र विहिरीत पडल्यामुळे त्याला पकडण्यात आले आहे. पोलिस उगले यांनी दाखवलेल्या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

आरोपी हा पळाल्यानंतर पोलिस नाईक सचिन उगले याने देखील त्याचा पाठलाग केला. मात्र अंधार असल्याने दोघेही विहिरीत पडले होते. उगले यांच्या हाताला खरचटले असून त्याच्यावर दवाखान्यात औषधोपचार सुरू होते. आता त्यांची तब्येत चांगली आहे.– डॉ. कुणाल सोनवणे, उपविभागीय पोलिस अधिकारी

# राहुरीच्या येथे ऊस तोडी करिता डझनभर कारखान्यांचे ऊस तोड कामगार दाखल

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्याला उसाचे आगार समजले जाते केवळ जिल्ह्यातीलच नव्हे तर जिल्हाबाहेरील साखर कारखान्यांना ऊस पुरवठा करणार्या राहुरी परिसरातील १२ हजार हेक्टर क्षेत्रावर गाळपासाठी सज्ज असलेल्या ऊस क्षेत्रावरील शेतकर्यांना ऊस तोडणी मिळविण्यासाठी वण-वण भटकंती करण्याची वेळ ओढवल्याचे बिकट चित्र दिसत आहे. तनपुरे कारखाना बंद अवस्थेत असल्यामुळे प्रसाद शुगर कारखान्याकडून शेतकर्यांना ऊस तोडणी देण्याचा प्रयत्न सुरू आहे.



राहुरी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात ऊस क्षेत्र उपलब्ध आहे. सर्वाधिक सरासरी देणारा ऊस पिकविणार्या या तालुक्यातील शेतकर्यांचा उसासाठी सुरु असलेला संघर्ष वाढतच आहे. या परिसरातील ऊस नेण्यासाठी प्रवरा, संगमनेर, अगस्ती, संजीवनी, कोळपेवाडी, अंबालिका, श्रीगजानन महाराज कारखाना (युटेक शुगर), पराग शुगर (पुणे), श्रीगोंदा, ओंकार शुगर (श्रीगोंदा) आदी डझणभर साखर कारखान्यांकडून राहुरी परिसरात ऊस तोडणी सुरू आहे, परंतू सर्व कारखान्यांच्या ऊस तोडणी मजुरांच्या टोळ्या कमी प्रमाणात आल्याने शेतकर्यांना ऊस तोडणी मजुर मिळविण्यासाठी अक्षरशः भटकंती करावी लागत आहे. डॉ. बाबुराव दादा तनपुरे सहकारी साखर कारखान्याचा बॉयलर पेटण्याची शक्यता धुसर झाली आहे. तनपुरे कारखाना बंद अवस्थेत असल्याने शेतकर्यांना ऊस तोडणीसाठी अडचण निर्माण झाली आहे. राहुरी हद्दीमध्ये आडसाली ऊस क्षेत्र १. ५ हजार हेक्टर, पूर्व हंगामी सुरू ३. ५ हजार हेक्टर, सुरू गळीतसाठी ७ हजार हेक्टर असे एकूण १२ हजार हेक्टर ऊस क्षेत्र गळीतासाठी उभे आहे, परंतू ऊस तोडणीसाठी अत्यल्प यंत्रणा आल्याने शेतकर्यांची धाकधूक वाढत आहे. आपले शेती क्षेत्र मोकळे करण्यासाठी शेतकरी कारखान्यांच्या कार्यालयांसह ऊस तोडणीसाठी वण-वण भटकंती करीत असल्याचे चित्र दिसत आहे.

उसाचा गळीत हंगाम सुरू होऊनही साखर कारखान्यांकडून ऊस दर जाहीर होत नसल्याने शेतकरी चिंतातूर झाले आहेत. विधानसभा निवडणुकीत काही साखर सम्राटांनी कोट्यवधी रुपयांचा चुराडा करीत, निवडणुकीसाठी जणू पेटाराच उघडून दिला, परंतू शेतकर्यांच्या हितार्थ कोणताही राजकीय नेता बोलत नसल्याने ऊस उत्पादक शेतकर्यांची चिंता वाढत आहे.मागिल गळीत हंगामात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवरा साखर कारखान्याने ३१०० रुपये असा उच्चांकी दर दिला होता. श्रीगोंदा येथील गौरी शुगर कारखान्याने ३,००६ रुपयांचा दरासह २० किलो साखरेचे वाटप केले होते. दरम्यान, मागिल गाळपाच्या उसाला बहुतांश कारखान्यांनी २७०० ते २८०० रुपये प्रतिटन दर दिला होता

# विराज सासवडे हस्ताक्षर स्पर्धेत तालुक्यात प्रथम

**पारनेर । प्रतिनिधी**

पारनेर तालुक्यातील ग्रामिण भागातील जि.प.च्या धोत्रे खुर्द शाळेतील तिसरी वर्गातील विद्यार्थी विराज सुभाष सासवडे याने नुकत्याच पारनेर येथे झालेल्या तातुकास्तरीय हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले.



मुलांमधे हस्तलेखनाची आवड निर्माण व्हावी, सुवाच्च सुंदर वळणदार अक्षरांचे उद्दीष्ठ ठेवून अहमदनगर जिल्हा परिषद दरवर्षी विविध गुणदर्शनाच्या माध्यमातून सुंदर हस्ताक्षर स्पर्धा हा उपक्रम आयोजीत करत असते.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात नुकत्याच झालेल्या तालुकास्तरीय हस्ताक्षर स्पर्धेत पारनेर तालुक्यातील धोत्रे खुर्द जिल्हा परिषदेच्या तिसरीच्या वर्गातील विद्यार्थी विराज सुभाष सासवडे याने बालगटात प्रथम क्रमांक पटकवला. त्याला वर्गशिक्षक सचिन ठाणगे व मुख्याध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल पारनेर तालुक्याचे आमदार काशिनाथ दाते , शिक्षणाधिकारी भास्कर पाटील,गटशिक्षणाधिकारी सिमाताई राणे ,विस्तार अधिकारी कांतिलाल ढवळे, केंद्रप्रमुख यादव येवले व ग्रामस्थ यांनी त्याचे अभिनंदन केले.

# कोपरगांव येथे विवेक कोल्हे यांच्या उपस्थितीत महारक्तदान शिबिर संपन्न

**अहिल्यानगर । कोपरगाव । प्रतिनिधी**

कोपरगाव : रविवार दिनांक ०८ डिसेंबर रोजी, गोकुळधाम, गोरक्षा केंद्र, कोकमठाण यांच्या वतीने व्यापारी धर्मशाळा, बाजार तळ, कोपरगांव येथे महारक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.या प्रसंगी विवेक कोल्हे उपस्थित होते. त्यांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले! या शिबिरात एकूण २६५ दात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदविला आणि संजीवनी ब्लड बँक व जनकल्याण रक्तपेढी, नाशिक यांनी सहकार्य केले. अनेक दानांमधील पवित्र असे मानले जाणारे रक्तदान करून सुमारे २६५ दात्यांनी, रुग्णांना जीवनदान दिले आहे.




सध्या अनेक रुग्णालयात रक्ताचा तुटवडा जाणवत असल्याने हा उपक्रम कौतुकास्पद झाला आहे. असेच उपक्रम राबवून समाजाची आणि रुग्णांची सेवा करणे हाच मानवता धर्म आहे, असे मनोगत व्यक्त केले! या उपक्रमाला विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, कोपरगांव, छत्रपती संभाजी महाराज जन्म उत्सव समिती, मुंबादेवी तरूण मंडळ साईगांव पालखी सोहळा,लायन्स क्लब ऑफ कोपरगांव, सकल जैन समाज, कोपरगांव, गोदाम गल्ली व्यापारी असोसिएशन, रोटरी क्लब ऑफ कोपरगांव सेंट्रल, श्री नर्मदेश्वर फाऊंडेशन, कोपरगांव,श्री साईदेवा प्रतिष्ठाण, कोपरगाव,कोपरगाव तालुका केमिस्ट असोसिएशन, तेजज्ञान फाऊंडेशन, कोपरगांव, साईसेवा प्रतिष्ठाण, कोपरगाव, योगप्रचार प्रसार केंद्र, कोपरगांव, कोपरगाव पिपल्स बँक सर्व कर्मचारी वृंद, कोपरगांव तालुका व्यापारी महासंघ,केअर टेकर ग्रुप, कोपरगांव, साईसमर्थ प्रतिष्ठाण, कोपरगांव,धर्मयोद्धा शामभाऊ प्रतिष्ठाण, काळभैरवनाथ मित्र मंडळ, कोपरगांव, साईनिवारा मित्र मंडळ, कोपरगांव, कोपरगाव नगरपरिषद् कर्मचारी वृंद,कोपरगांव शहर पोलीस स्टेशन,कोपरगांव ग्रामीण पोलीस स्टेशन,सकल हिंदू समाज, कोपरगांव, श्रीमान गोकुळचंदजी विद्यालय, कोपरगांव,द आर्ट ऑफ लिव्हिंग, कोपरगांव,कोपरगांव तालुका मराठी पत्रकार संघ, कोपरगांव,ब्राम्हण सभा, कोपरगांव, विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, कोपरगांव,माता वैष्णोदेवी ग्रुप,कोपरगांव,कोकमठाण ग्रामस्थ, कोकमठाण,कोपरगाव शहर शिवसेना,बी.एन.एन.सी. क्रिकेट क्लब, आदिनाथ इन्क्लेव्ह गृहनिर्माण सहकारी संस्था, कोपरगांव,

लिओ क्लब ऑफ शिर्डी साई, क्रेडाई , माहेश्वरी समाज, कोपरगांव, नरसिंह प्रतिष्ठाण, कोपरगांव, वास्तव फाऊंडेशन, कोपरगांव यांचे सहकार्य लाभले तसेच या प्रसंगी, गोकुळधाम गोरक्षा केंद्राचे प्रवीण पटणी,अमोल काले , शैलेश ठोळे, आनंद पहाडे, आनंद दगडे, अमित जैन व सर्व सदस्य उपस्थित होते

# कुगाव-शिरसोडी जोडपुलाचे काम वेगाने सुरू पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा होणार एकत्रित



**सोलापूर । प्रतिनिधी**

कुगाव ग्रामपंचायतीच्या प्रयत्नातून ३० किलोमीटर पाण्याने वेढलेल्या कुगाव गावाचा दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. कुगाव-शिरसोडी जोडपुलाचे काम सध्या प्रचंड वेगाने सुरू असून, या पुलामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या दोन्ही भागांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा निर्माण होणार आहे.

ग्रामपंचायत कुगावच्या माजी सरपंच तेजस्विनी दयानंद कोकरे यांनी या कामाबाबत समाधान व्यक्त केले आहे. त्या म्हणाल्या, २०१९ मध्ये सरपंचपदी कार्यरत असताना गावाचा पाण्याद्वारे प्रवासाचा मुख्य प्रश्न मार्गी लावण्यासाठी जोडपुलाचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. सोलापूर जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री दत्तात्रय भरणे, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मदनराव देवकाते यांच्या सहकार्यामुळे या प्रकल्पाला गती मिळाली.

### ३९६ कोटींची मंजुरी

**विधानसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून ३९६ कोटींच्या निधीला मंजुरी देण्यात आली. २३ ऑगस्ट २०२४ रोजी या प्रकल्पाचे काम भूमिपूजन करण्यात आले. T & T Infra Ltd Pune या कंपनीच्या मार्फत हे काम ९०० दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.**

### दळणवळणासाठी नवा अध्याय

**या पुलामुळे कुगावसह शेजारच्या गावांना मोठा फायदा होणार आहे. जलमार्गाने प्रवास करावा लागणाऱ्या नागरिकांना आता अधिक सुरक्षित आणि जलद प्रवासाची सुविधा मिळणार आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा यांच्यातील व्यापारी, आर्थिक आणि सामाजिक संबंध अधिक बळकट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**

# पोटच्या गोळ्यासाठी वडिलांचे धाडस बिबट्याच्या जबड्यातून मुलाची सुटका


**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील राहुरी परिसरात वन विभागाच्या दुर्लक्षित भुमिकेने बिबट्याचा वावर मानवी वस्त्यांकडे वाढला आहे. प्रत्येक दिवशी कोणत्या न कोणत्या गावात बिबट्याचे दर्शन होत असतानाच काल ताहाराबाद परिसरात मोठा अनर्थ टळला.

रुद्र सचिन गागरे वय ६ या चिमुरड्याला बिबट्याने जबड्यात घेतले. यावेळी वडिल सचिन गागरे यांनी मोठ्या धाडसाने बिबट्याशी झुंज देताना मुलाची सुटका केल्याचा प्रकार घडला. मुलाला बिबट्याचे दात लागल्याने त्यास सिव्हील हॉस्पिटलला दाखल करण्यात आले आहे.

ताहाराबाद येथील संत महिपती महाराज मंदिर परिसरात असलेल्या झावरे वस्तीवर काल रविवारी दि.८ रोजी सायंकाळी ६ वाजता प्रकार घडला. सचिन गागरे हे ताहाराबाद येथील बाजाराचा दिवस असल्याने बाजारासाठी गेले होते. त्यांची पत्नी शेतामध्ये कामासाठी गेली होती. बाजार करून घरी परतल्यानंतर त्यांनी घरात पाहिले असता मुलगा रुद्र दिसला नाही. रुद्र घरात न दिसल्याने सचिन गागरे हे मुलाला पाहण्यासाठी घराबाहेर आले. वडिलांची गाडी आलेली पाहून घराकडे धाव घेतलेल्या रुद्रवर लगतच्या काटवनात दबा धरून बसलेल्या बिबट्याने झेप घेत हल्ला चढवला. बिबट्याचा व मुलगा रुद्र याचा मोठा आवाज आला. रुद्र बिबट्याच्या तावडीत असल्याचे पाहून वडिलांनी जीवाची पर्वा न करता त्याचा सामना केला. यात सुदैवाने बिबट्याने रुद्रला तिथेच सोडून धूम ठोकली. बिबट्याच्या हल्ल्यात रुद्रच्या पाठीवर दाताच्या जखमा झाल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती समजताच सरपंच बापू जगताप, सेवा संस्थेचे अध्यक्ष राजू झावरे, पप्पू माळवदे, निवृत्ती घनदाट, अमोल किनकर आदींसह परिसरातील ग्रामस्थांनी धाव घेतली. रुद्र यास लगतच्या ताहाराबाद ग्रामिण रुग्णालयात हलविण्यात आले. वैद्यकीय अधिकारी यांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यास अहिल्यानगर येथील सिव्हील रुग्णालयात नेण्यास सांगितले. गागरे कुटुंबिय व ग्रामस्थांनी रुद्र यास पुढील उपचारासाठी सिव्हील रुग्णालयात दाखल केल्याची माहिती सरपंच बापू जगताप यांनी दिली. त्यांनी सांगितले की, घटना घडल्यानंतर वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी फिरकलेच नाही. वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी बिबट्याच्या वास्तव्याबाबत गंभीर नसल्याचे दिसत आहे. एखाद्याचा जीव गेल्यानंतरच वन विभागाला जाग येते. निष्ठूर अधिकार्यावर शासनाने कठोर कारवाई करावी.

घटना घडल्यानंतर वन विभागाशी संपर्क साधण्यात आला. परंतु वन विभागाच्या कोणत्याही अधिकार्याने घटनास्थळी येण्याची तसदी घेतली नसल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. वन विभागाला बिबट्याबाबत अनेकदा माहिती देऊनही कोणतीही उपाययोजना केली जात नाही. ताहाराबाद, म्हैसगाव परिसरात मोठे जंगल क्षेत्र आहे. तसेच ऊस क्षेत्र झपाट्याने कमी होत असल्याने बिबट्या आसरा घेण्यासाठी आता मानवी वस्त्यांकडे आगेकूच करीत आहे. मुलाला बिबट्याचे दात लागल्याने त्यास सिव्हील हॉस्पिटल अहिल्यानगर येथे दाखल करण्यात आले आहे.



# रोजगार आणि पाण्याची उपलब्धता झाली तर कोपरगांवची बाजारपेठ अधिक गतिमान होणार-विवेक कोल्हे

## ग्राहक सन्मान योजना भाग्यवंत ग्राहकांना विविध बक्षिसांचे वितरण

**कोपरगाव । प्रतिनिधी**

कोपरगावकरांनी कोपरगावकरांच्या पाठीशी उभे राहिलं तर बाजारपेठ ऊर्जेत अवस्थेत येऊ शकते. धूळ आणि गुळ अशी ओळख असणारा कोपरगाव गुळाची बाजारपेठ तर आता कमी झाली आहे मात्र धुळ अद्यापही तशीच असल्याने त्यावर काम करण्याची गरज आहे. लहान मोठ्या व्यापाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी स्थानिक बाजारपेठेत ग्राहकांनी खरेदी करावी म्हणून संजीवनी उद्योग समूह व कोसाका उद्योग समूहाच्या सहकार्याने कोपरगाव तालुका व्यापारी महासंघ आणि तालुका किराणा मर्चंट असोसिएशन यांनी राबविलेली ग्राहक सन्मान योजनेचे भाग्यवंत ग्राहकांना पारितोषक देण्यात आले. ही योजना खऱ्या अर्थाने ग्राहकांबरोबरच बाजारपेठेचा ही सन्मान करणारी योजना आहे असे मत सहकार महर्षी कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी व्यक्त केले. मी स्वतः देखील कोपरगावच्या बाजारपेठेत खरेदी करून इथल्या दर्जेदार वस्तूंचा अनुभव घेतला आहे. उच्च शिक्षणानंतर कोपरगाव मध्ये काम करत असताना बाजारपेठेत फिरल्यानंतर अनेक दुर्मिळ वस्तू आणि जुने अनुभवी व्यापारी दिसून आले. उदाहरणच द्यायचे झाले तर भन्साळी उद्योजक यांचे उत्पादन केवळ देशातच नव्हे तर परदेशात सुद्धा नावलौकिक मिळवणारे ठरले आहे. माझा नेहमी प्रयत्न असतो संजीवनी उद्योग समूहाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या पगार बोनस हे बाजारपेठेत त्यांनी खर्च करावे म्हणून ऑनलाईन खरेदी टाळा यासाठी अनेकदा आवाहनही केले आहे.



काका कोयटे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी जी मोहीम हातात घेतली ती निश्चितच कौतुकास्पद आहे. आपल्या युवकांची बुद्धिमत्ता ही आपल्या बाजारपेठेत नाविन्यपूर्णता आणण्यासाठी उपयुक्त ठरायला हवी त्याचा फायदा बाहेर होण्यापेक्षा आपल्या शहर आणि गावासाठीच कसा होईल या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे. काळाची पाऊले ओळखून जर आपण बदल केले तर प्रवाहासोबत आपण टिकतो. विविध संस्थांच्या माध्यमातून स्वर्गीय शंकरावजी कोल्हे साहेब व स्वर्गीय काळे साहेब या दोघांनी अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला. त्याच विचारांवर सोनेवाडी येथील एमआयडीसीसाठी संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने आम्ही प्रयत्न केले त्याला यशही आले तसेच रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून आपण हजारो युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केला.

जर शेतकरी सुखी झाला तर बाजारपेठ फुलत असते. पाणी ही सर्वात मोठी समस्या अलीकडच्या काळात झाली आहे त्यावर मात करून पश्चिमेचे पाणी जर पूर्वेकडे वळवले तरच हा प्रश्न सुटून कोपरगावची बाजारपेठ गतिमान होणार आहे ही दूरदृष्टी अनेक वर्षांपूर्वी स्वर्गीय कोल्हे साहेब यांना होती त्या विषयाला काही प्रमाणात यश आले आहे. सामूहिकरीत्या स्थानिक व्यापाऱ्यांना आपण सर्वांनी प्राधान्य देणे ही ग्राहक म्हणून आपली देखील जबाबदारी आहे. सत्तर हजारहून अधिक ग्राहकांनी या योजनेत सहभाग घेतला यामुळे येणाऱ्या काळात अर्थचक्र फिरण्यास मदत होईल.

कोपरगावमधील उच्चशिक्षित तरुण हे परदेशामध्ये स्थायिक होतात. मोठ्या पगाराच्या नोकरी अनेक युवकांना उपलब्ध झाल्या मात्र त्यांनी सण-उत्सवाची खरेदी आणि दैनंदिन किराण्याची खरेदी देखील सुट्टीला आल्यानंतर कोपरगावमध्येच करून ती घेऊन जावी ज्यामुळे बाजारपेठेत हातभार लागेल. कोपरगाव एमआयडीसी मध्ये स्थानिक व्यापाऱ्यांना कमी पैशात जागा उपलब्ध व्हाव्या यासाठी आपणा सर्वांसमवेत प्रयत्न करण्यासाठी मी कटिबद्ध राहील. जर बाजारपेठ चांगली असेल तर पर्यायाने आपल्या शहर आणि तालुक्याचे नाव हे बाहेर अधिक अभिमानाने घेतले जाते तसे काम करू अशी अपेक्षा शेवटी कोल्हे यांनी व्यक्त केली.या प्रसंगी प्रियदर्शनी महिला बचत गटाच्या अध्यक्षा पुष्पाताई काळे,राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे ,उद्योजक अरविंद भन्साळी,संजय भन्साळी,औद्योगिक वसाहत व्हा.चेअरमन केशव भवर,अजित लोहाडे ,राजेंद्र बंब, नारायण अग्रवाल,पटवर्धन साहेब,बबलू वाणी, विनोद राक्षे,तुलसीदास खुबाणी,संतोष गंगवाल आदीसह पारितोषक विजेते मान्यवर,व्यापारी बांधव आणि नागरिक बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# संत जगनाडे महाराज जयंती उत्साहात साजरी

**पुलगाव । प्रतिनिधी**

राव राठोड तेली समाजाच्या वतीने संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या ४००व्या जयंतीचा कार्यक्रम नगर परिषद समोर आर एच कम्प्युटर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाचे उद्घाटन धनोडी धरणाचे मुख्य अधिकारी सुशील खुणे यांच्या हस्ते संताजी महाराजांच्या प्रतिमेस हार अर्पण करून करण्यात आले. यावेळी राव राठोड तेली समाजाचे अध्यक्ष दिलीप गुल्हाने, सचिव गिरीश शिरभाते, माजी अध्यक्ष डॉ. सचिन डहाके, आणि डॉ. निलेश गुल्हाने यांनीही प्रतिमेला अभिवादन केले. कार्यक्रमात मनीषा लोखंडे यांनी संताजी महाराजांची आरती करून पूजन केले.

यानंतर मसाले भात व जिलबीचा प्रसाद मोठ्या संख्येने उपस्थित समाजबांधवांमध्ये वाटप करण्यात आला. संताजी महाराजांच्या जीवनचरित्रावर गिरीश शिरभाते, प्रल्हादराव काळे, व विणाताई काळे यांनी सखोल माहिती दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हर्षल काळे, सौरभ श्रीराव, अनिल गिरुळकर, प्रणेश शिरभाते, सतिश जयसिंगपुरे, आशिष काळे, अमोल बिजवे, चिंतामन आसोले, निखिल गुल्हाणे, निरंजन लोखंडे, सचिन आसोले, दिलीप महाजन यांनी विशेष योगदान दिले. तसेच महिला मंडळाच्या पुढाकाराने कार्यक्रम अधिक रंगतदार झाला. पुष्पाताई श्रीराव, अल्काताई काळे, जयश्रीताई शिरभाते, चैताली हर्षल काळे, रोशनी काळे, मोना अजमिरे, आणि जयाताई जयसिंगपुरे यांनी विशेष सहकार्य केले.

या कार्यक्रमाने समाजबांधवांमध्ये एकात्मतेचा संदेश दिला आणि संताजी महाराजांच्या विचारांचे महत्व अधोरेखित केले.

# संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांची ४०१वी जयंती उत्साहात साजरी

**मूल । प्रतिनिधी**

दि. ८ डिसेंबर २०२४ रोजी आदर्श गाव कोसंबी येथे तेली समाजाच्या वतीने संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांची ४०१वी जयंती आणि समाज प्रबोधन कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पडला.



कार्यक्रमाचे उद्घाटन नारायण गिरडकर यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी कोसंबीचे सरपंच रविंद्र किसन कामडी होते. संताजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रास्ताविक अंबादास गिरडकर यांनी केले. सरपंच रविंद्र कामडी यांनी आपल्या भाषणात संताजी महाराजांचे विचार समाजाच्या प्रगतीसाठी मार्गदर्शक असल्याचे सांगून समाज संघटनेच्या गरजेवर भर दिला. शिक्षण, आत्मसन्मान, आणि संस्कृती संवर्धनासाठी तेली समाजात शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

युवराज ठाकरे यांनी संताजी महाराजांचे विचार आत्मसात करण्याचे आवाहन केले. चंदाताई विनोद कामडी यांनी संताजी महाराजांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी विचार मांडले. गुरूदास गिरडकर यांनी समाजातील युवकांनी चांगले शिक्षण घेऊन समाजसेवा करण्याची गरज व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष गुरनुले यांनी केले, तर आभार प्रदर्शन विक्की गिरडकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी देविदास गिरडकर, विनोद कामडी, पुंडलीक गिरडकर, राजेंद्र गिरडकर, गणेश साठोने, विजय कामडी, अनवेश कामडी, यशवंत गिरडकर, भास्कर गिरडकर, भुपतराव कामडी, किसनराव कामडी, गोकुल गिरडकर, सुमित कामडी, आत्माराम गिरडकर, संदीप गिरडकर, विक्रम गिरडकर, लखन गिरडकर, अविष्कार कामडी, सारंग गिरडकर, ओम साई गिरडकर, अमित गिरडकर यांच्यासह कोसंबी येथील सर्व गावकरी मंडळींनी परिश्रम घेतले.

# लाच स्वीकारताना कुडाळ येथील तलाठी शरद साळुंखे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ताब्यात

**सातारा । प्रतिनिधी**

कुडाळ येथील तलाठी शरद लिंबराज साळुंखे (वय ५४), यांना लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. शरद साळुंखे यांच्यावर वाई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साळुंखे यांनी दहा गुंठे क्षेत्रातील खरेदीच्या दस्ताच्या सातबारा पत्रकी पक्की नोंदीसाठी पाच हजार रुपयांची लाच मागितली होती. त्यापैकी चार हजार रुपये स्वीकारताना त्यांना रंगेहाथ पकडले.

तक्रारदाराने सातबारा नोंदीसाठी साळुंखे यांच्याकडे गेल्यावर पाच हजार रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदाराने तत्काळ सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागात तक्रार दाखल केली. पोलीस उपअधीकारी राजेश वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीधर भोसले यांच्या पथकाने तपास करून लाच मागणीची सत्यता पडताळली.

तडजोडीनुसार साळुंखे यांनी चार हजार रुपये स्वीकारले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ लाच स्वीकारताना त्यांना पकडले आणि वाई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

सातारा शहरात तसेच जिल्ह्यात शासकीय कार्यालयातील कर्मचारी आणि अधिकारी लाच मागितल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या १०६४ टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वेश्याव्यवसाय करणाऱ्या रिलस स्टार सह चौघांना अटक,सातारा पोलिसांची कारवाई

**सातारा । प्रतिनिधी**

सातारा पोलिसांनी एक मोठी कारवाई करत वेश्याव्यवसाय करणाऱ्या रिलस स्टारसह चार जणांना अटक केली आहे. या प्रकरणी सातारा तालुका पोलिस ठाण्यात मानवी अनैतिक व्यवसायाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सातारा पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून वेश्याव्यवसाय चालवणारी एक महिला आणि तिच्या साथीदारांची माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी बनावट गिराईक बनवून महिला आणि तिच्या साथीदारांना वेश्या व्यवसायाबद्दल बोलण्यासाठी फोन केला. त्यानंतर पोलिसांनी सोनगाव रस्त्यावर आयोजित केलेल्या पार्टीत जाऊन त्या महिला आणि तिच्या साथीदारांना रंगेहाथ पकडले.

प्राथमिक चौकशी केल्यानंतर पोलिसांना समजले की, ज्या महिला आणि पुरुषांची अटक केली गेली, त्यात एक महिला रिलस स्टार म्हणून ओळखली जाते. पोलिसांनी गणेश मनोहर भोसले (कोरेगाव), ईश्वर सुभाष जाधव (विलासपुर, गोडोली), विरेंद्र महेंद्र जाधव (सदरबझार, सातारा) आणि रिलस महिला स्टार यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस निरीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली या कारवाईला यश आले. पोलिसांनी घटनास्थळी छापा मारून रोख रकमेसह मोबाईल फोन आणि दोन दुचाकी हस्तगत केल्या. घटनास्थळी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल २,२७,५०० रुपये आहे.

सातारा पोलिसांनी ही कारवाई पोलिस निरीक्षक अरुण देवकर आणि पोलिस निरीक्षक निलेश तांबे यांच्या नेतृत्वाखाली केली, ज्यामध्ये सपोनि सुधीर पाटील, फौजदार श्वेता पाटील, पोलिस मोना निकम, पंकजा जाधव, विजय कांबळे, शरद फेडले, प्रवीण फडतरे आणि क्रांती निकम यांनी सहभाग घेतला.

# बांगलादेशातील हिंदू,बौद्ध,जैन,शीखांवर होणाऱ्या अत्याचारांच्या विरोधात धामणगावात आक्रोश मोर्चा



**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

बांगलादेशातील हिंदू संत आणि अल्पसंख्याकांवर सातत्याने होणाऱ्या अत्याचारांविरोधात हिंदू समाजाने मंगळवारी धामणगाव रेल्वे येथे आक्रोश मोर्चा काढला. बांगलादेशातील हिंदू, बौद्ध, शीख आणि जैन समाज अत्यंत असुरक्षित असून, तेथे महिलांवर होणाऱ्या अत्याचारांमुळे संताप व्यक्त करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ सकल हिंदू समाज, विवेक विचार मंच, बजरंग दल, राष्ट्रीय गोरक्ष मंच या संघटनांनी या मोर्चाचे आयोजन केले होते.मोर्चाला सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरुवात झाली आणि हा मोर्चा तहसील कार्यालयावर जाऊन थांबला. शेकडो कार्यकर्ते या रॅलीत सहभागी झाले होते. मोर्चाच्या शेवटी तहसील कार्यालयात तहसीलदार आशिष वीर यांना निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन इस्कॉनचे प्रमुख दिनेश बुधलानी, विवेक विचार मंचाचे अमरावती जिल्हा संयोजक प्रशांत मून आणि धर्म जागरण मंचाचे अध्यक्ष कमलजी छांगाणी यांच्या हस्ते देण्यात आले.

### कठोर कारवाईची मागणी

**या निवेदनात बांगलादेशातील हिंदू, बौद्ध, शीख, जैन समाजाच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर कठोर पावले उचलण्याची मागणी करण्यात आली. तसेच भारत सरकारनेही या बाबतीत ठोस भूमिका घेण्याचे आवाहन करण्यात आले.**

### सहभागातून दिसले एकतेचे दर्शन

**या मोर्चादरम्यान सर्व समाजबांधव एकत्र येऊन आपल्या मागण्यांसाठी एकजुटीने आवाज उठवताना दिसले. अशा प्रकारच्या अन्यायाविरुद्ध समाजाने एकत्र येऊन उभे राहणे महत्त्वाचे असल्याचे वक्त्यांनी यावेळी सांगितले.**

आपण तरी देशाच्या जनतेची दिशाभूल करू नका

# शरद पवारांच्या मतांच्या शंकेवर फडणवीसांनी दिले आकडेवारीत उत्तर

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात ठिकठिकाणी महाविकास आघाडीला अनुकूल वातावरण होते. पण निकाल अनुकूल लागला नाही. हे संशयास्पद असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी महायुतीला मिळालेल्या मतांच्या आकडेवारीवर देखील भाष्य करत प्रश्न उपस्थित केला आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. जनतेची दिशाभूल करू नका, असा सल्ला फडणवीस यांनी दिला आहे.शरद पवारांच्या विधानावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शरद पवार साहेब, आपण ज्येष्ठ नेते आहात, किमान आपण तरी देशातील जनतेची दिशाभूल करू नका. जास्त मते मिळूनही कमी जागा कशा? चला २०२४ लोकसभेत काय झाले ते पाहू, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी आकडेवारीच सांगितली आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले, २०२४ च्या लोकसभेत भाजपाला मते १,४९,१३,९१४ आणि जागा ९, पण काँग्रेसला मते ९६,४१,८५६ आणि जागा १३. शिवसेनेला ७३,७७,६७४ मते आणि ७ जागा, तर राष्ट्रवादी-शरद पवार गटाला ५८,५१,१६६ मते आणि ८ जागा. २०१९ च्या लोकसभेचे उदाहरण तर फारच बोलके आहे. काँग्रेसला ८७,९२,२३७ मते होती आणि १ जागा मिळाली, तर तत्कालीन राष्ट्रवादीला ८३,८७,३६३ मते होती आणि जागा ४ आल्या. पराभव स्वीकारला तर यातून लवकर बाहेर याल! तुम्ही तरी आपल्या सहकाऱ्यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला द्याल, अशी अपेक्षा आहे, असे म्हणत टोला देखील लगावला आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# बांग्लादेशात होत असलेल्या हिंदूवरील अन्याय अत्याचारा विरोधात राहुरीत हिंदू समाज एकवटला



**राहुरी । प्रतिनिधी**

नगर मनमाड मार्गालगत असलेल्या खरेदी विक्री संघाच्या कार्यालयाजवळ सकाळी सर्व हिंदू बांधव एकवटल्यानंतर या मोर्चास सुरुवात झाली. माता भगिनी तरुण वर्ग मोचांत सहभागी झाले होते. बांग्लादेशामध्ये अल्पसंख्याक हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारावर संपूर्ण जगभरातून टीका होत आहे.संन्यासी चिन्मय कृष्ण दास यांनी अल्पसंख्याक हिंदूवरील अत्याचाराचा निषेध केला म्हणून त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला टाकून त्यांना अटक करण्यात आली आहे. सदरील घटनेचा निषेध एक राष्ट्र महणून भारत सरकारने देखील केला आहे. बांग्लादेशमध्ये ४ ते २० ऑगस्ट दरम्यान ५० जिल्हांमध्ये हिंदू समाजावर २ हजारहून अधिक जातीय हल्ले झाले आहे.

यामध्ये हिंदू घरे, हिंदू समाजाचे व्यवमाय आणि हिंदू समाजाची मंदिरे यांच्यावरील हल्ल्यांचा समावेश आहे. दरम्यानच्या हल्ल्यांमध्ये असंख्य हिंदू बांधवांची घरे आणि व्यवसाय जाळून, उध्वस्त करून अल्पसंख्याक हिंदू समाजाला रस्त्यावर आणले आहे. हिंदू महिलांवर बलात्कार करण्यात आले आहे. बांग्लादेश मधील हिंदू विरोधी भावना एवढ्या टोकाला गेली आहे की हिंदू महिलांवर सामुहिक बलात्कार झाल्याच्या घटना पुढे आल्या आहेत. बांग्लादेशमध्ये काही ठिकाणी तर हिंदूंवर अत्याचार होत असताना बांग्लादेशाचे लष्करच स्वतः त्या अत्याचारांना सहकार्य करत सी. सी. टी. व्ही. कॅमेरे मोडून काढतानाचे दृश्य समोर आले आहे. बांग्लादेशातील नागरी सुरक्षेसाठी असणाऱ्या राज्य संस्थाच अल्पसंख्याक हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारास सहाय्य करताना समोर आल्याने संपूर्ण जगभरातील मानवाधिकार संस्थांनी चिंता व्यक्त करून येणाऱ्या काळात हे थांबवण्यासाठी प्रयत्न नाही झाले तर संपूर्ण हिंदू समाजाचे बांग्लादेशातील अस्तित्व धोक्यात येईल अशी शक्यता वर्तवली आहे.

बांग्लादेशातील हिंदूंच्या मानवाधिकारांचे संरक्षण करणे आणि मानवाधिकारांच्या बाजूने उभे राहणे आपल्या राष्ट्राचे आणि राष्ट्रातील नागरिकांचे कर्तव्य आहे. आज भारताने एक राष्ट्र म्हणून बांग्लादेश मध्ये असुरक्षित असलेल्या हिंदूंना मानवाधिकारांचे संरक्षण मिळण्यासाठी अधिक प्रयत्न करावेत अशी भावना भारतातील हिंदू समाजाची आणि मानवाधिकाराला समर्थन करणाऱ्या नागरिकांची आहे. बांग्लादेशमध्ये होत असलेल्या अल्पसंख्याक हिंदूवरील अत्याचाराच्या विरोधात भारतातील हिंदू समाजात प्रचंड रोष आहे, आज हिंदू समाजात असलेला रोष या मानवाधिकार मूक मोर्चाच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आला आहे. आज आपल्या माध्यमातून आम्ही भारतीय राज्य शासनाला आमच्या भावना पोहचू इच्छितो कि, बांग्लादेश मध्ये अल्पसंख्याक हिंदू बांधवांवर होत असलेले अत्याचार थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर योग्य अशी भूमिका घेवून अल्पसंख्याक हिंदू हिताचे योग्य ते पाऊल उचलावे. यावेळी प्रसाद बानकर, आदिनाथ महाराज दुशिंग, अर्जुन महाराज तनपुरे यांनी मनोगत व्यक्त केले. आ. शिवाजी कर्डिले, हर्ष तनपुरे, राजु शेटे, अक्षय कर्डिले, सुरेश बानकर, अनिल कासार, मराठा महासंघाचे सुनिल निमसे, देवेंद्र लांबे, दादा पाटील सोनवणे, सुरेश बानकर, शरद बाचकर, तान्हाजी धसाळ, बाबासाहेब शिंदे, प्रतिक तनपुरे, अक्षय तनपुरे, आदिंसह महिला व पुरुष तरुण यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सुत्रसंचालन सुरज शिंदे यांनी केले.

# लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर दोन वर्ष बलात्कार

## सीआरपीएफ जवानाविरुद्ध गुन्हा दाखल

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील विरगाव पोलीस ठाण्यात केंद्रीय राखीव दलाच्या (सीआरपीएफ) जवानावर लग्नाचे आमिष दाखवून ३६ वर्षीय महिलेवर दोन वर्ष बलात्कार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तात्याराव दिनकर जाधव (रा. वक्ती, ता. वैजापूर) असे आरोपी जवानाचे नाव असून, या घटनेमुळे वैजापूर परिसरात खळबळ उडाली आहे.

तक्रारदार महिला अविवाहित असून तिची आरोपीशी ओळख मराठी मॅट्रिमोनी वेबसाईटद्वारे झाली होती. त्यानंतर दोघांमध्ये संवाद वाढत गेला आणि प्रेमसंबंध प्रस्थापित झाले. महिलेला नकार असूनही जाधव यांनी तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवले. १८ ऑगस्ट २०२२ ते १९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी जबरदस्तीने संबंध प्रस्थापित केले.



महिलेने लग्नाचा विषय काढताच जाधव यांनी पाच लाख रुपयांची मागणी केली आणि पैसे न दिल्यास लग्नास नकार दिला. तसेच कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने विरगाव पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार दाखल केली. विरगाव पोलिसांनी रविवारी, ८ डिसेंबर रोजी रात्री आठ वाजता तात्याराव जाधव यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा पुढील तपास फौजदार मनीषा जगताप करत आहेत.

## गोळवाडी ग्रामपंचायतीचा विक्रम

# झाडांऐवजी काँग्रेस व गोखरू गवताची लागवड



**वैजापूर । प्रतिनिधी**

गोळवाडी/मीरकनगर ग्रामपंचायतीने जिल्हा परिषद शाळेसमोर १.७५ लाख रुपयांची झाडे लावल्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात झाडांऐवजी काँग्रेस गवत आणि गोखरू गवताचे प्राबल्य दिसून येत आहे.

ग्रामसभेत ग्रामसेवक सुनील जाधव यांनी १.७५ लाख रुपये निधी शाळेच्या अंगणातील झाडांच्या लागवडीसाठी खर्च केल्याचे सांगितले. मात्र, सध्या त्या ठिकाणी केवळ गवत उगवले असून झाडांचे प्रमाण नगण्य आहे. त्यामुळे झाडांच्या निगराणीअभावी मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

गावकऱ्यांच्या मते, ग्रामपंचायत आणि ग्रामसेवकांनी शाळेच्या विकासाकडे दुर्लक्ष करून योजनांची अंमलबजावणी फक्त बिले काढण्यासाठी केली आहे. ग्रामसेवक सुनील जाधव आणि ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर कडाडून टीका होत आहे. याप्रकरणी ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे चौकशीची मागणी केली असून ग्रामपंचायतच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची गोंडवाना विद्यापीठ खो खो संघात निवड

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयातील विद्यार्थिनी खुशबू शेख आणि आयुषी मोहुर्ले यांची गोंडवाना विद्यापीठाच्या खो खो संघात निवड झाली. गोंडवाना विद्यापीठ,महिला खो खो संघ दिनांक १६ ते १९ डिसेंबर २०२४ ला राजस्थान येथील गोविंद गुरु जनजातीय विश्वविद्यालय, बॉन्सवाडा येथे पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ महिला खो खो स्पर्धेत गोंडवाना विद्यापीठाचा संघ सहभागी होणार आहे. गोंडवाना विद्यापीठाचा संघ दिनांक १४ डिसेंबर रोजी चंद्रपूर रेल्वे स्थानकावरून राजस्थान येथील गोविंद गुरु जनजातीय विश्वविद्यालय, बॉन्सवाडा येथे होणाऱ्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ महिला खो खो स्पर्धेकरिता रवाना होणार आहे. या संघात भद्रावती येथील विवेकानंद महाविद्यालयातील खुशबू शेख आणि आयुषी मोहुर्ले या खेळाडू महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली महिला खो खो संघाचे संघ व्यवस्थापक म्हणून गोंडवाना







विद्यापीठाने विवेकानंद महाविद्यालय भद्रावती येथील शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्राध्यापिका संगीता आर. बांबोडे यांची निवड केली आहे. प्राध्यापिका संगीता आर बांबोडे यांच्या नेतृत्वात गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली महिला खो खो संघ राजस्थान येथे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व आणि आपल्या क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन करणार आहेत. महिला खो खो संघात विवेकानंद महाविद्यालयातील खुशबू शेख आणि आयुषी मोहुर्ले तसेच संघ व्यवस्थापक म्हणून प्राध्यापिका संगीता आर. बांबोडे यांची निवड झाल्याबद्दल विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान, उपाध्यक्ष जयंत टेमुर्डे, सचिव अमन टेमुर्डे, कोषाध्यक्ष अभिजीत बोथले तसेच विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट) वरोरा चे सर्व पदाधिकारी आणि विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.जी. उमाटे, उपप्राचार्य डॉ. सुधीर आष्टुनकर, डॉ. ज्योती राखुंडे, डॉ. यशवंत घुमे, डॉ. रमेश पारेलवार, डॉ. सुहास तेलंग, डॉ. गजानन खामनकर, डॉ. जयवंत काकडे, प्रा.अमोल ठाकरे, प्रा. मालेकर, प्रा. लांबट, प्रा. कापगते, प्रा, दाते, प्रा. बैरम, प्रा. खोके, प्रा. बेलगावकर, सर्व प्राध्यापक वृंद आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या

# श्री दत्त जयंतीनिमित्त श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात आजपासून अखंड नाम जप यज्ञ सप्ताह

**कोल्हार । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील श्रीक्षेत्र कोल्हार येथील राजुरी रोड स्थित अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्रात परमपूज्य गुरुमाऊलींच्या कृपाशीर्वादाने श्री दत्त महाराजांच्या जयंतीनिमित्त रविवारी (दि. ८)पासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात दररोज अखंड नाम जप यज्ञ कार्यक्रम सोमवार (दि. १६)पर्यंत होणार असून सामुदायिक श्री गुरुचरित्र वाचनाचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती स्वामी सेवेकरी सुदर्शनभाऊ तरकसे यांनी दिली. यावेळी दररोज सकाळी भूपाळी आरती, नैवेद्य आरती तसेच नित्य स्वाहाकार, गणेश याग, चंडी याग, स्वामी याग, गीताई याग, रुद्र याग, श्री सत्यदत्त पूजन आदी कार्यक्रम होतील. सकाळी ८ ते संध्याकाळी ८ या वेळेत महिला सेवेकरी आणि पुरुष सेवेकऱ्यांची प्रहर सेवा मोठ्या उत्साहात होत असल्याचे स्वामी सेवेकरी सुधीरभाऊ खर्डे यांनी सांगितले. नियोजित सप्ताह यशस्वीपणे पार पाडण्यासाठी



सेवेकरी विजयभाऊ डेंगळे, किशोरभाऊ निबे, संजयभाऊ राऊत, राजूभाऊ भणगे, अनिलभाऊ खर्डे, काळे मामा तसेच महिला सेवेकरी पल्लवीताई धनवटे, ताडपत्रीकर ताई, सुनीता ताई शेळके, लताताई रोकडे, काळे मामी, सुनीताताई भणगे आदी प्रयत्नशील असल्याचे सह्याद्रीचा राखणदार या दैनिकाचे वार्ताहर गणेश सोमवंशी यांनी सांगितले

# मातोश्री आशाताई कुणावर महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन आणि महिला सुरक्षा दिन साजरा



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

मातोश्री आशाताई कुणावर कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात समाजशास्त्र विभाग, रोटरी क्लब, आणि आयसीसी कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने महापरिनिर्वाण दिन व महिला सुरक्षा दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर यांनी महापरिनिर्वाण दिनाचे महत्त्व विशद केले, तर प्रमुख पाहुणे रोटरी क्लबचे सेक्रेटरी उदय शिंदे होते. डवोकेट सारिका दाभाडे यांनी पोक्सो कायद्याविषयी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी पूर्वाध्यक्ष मायाताई मीहानी, चौधरी , बकाने , उपप्राचार्य डॉ. सपना जयस्वाल, तसेच विद्या विकास महाविद्यालयाच्या उपप्राचार्य आणि सचिव डॉ. नयना शिरभाते उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. डिंपल नवले यांनी केले, प्रस्ताविक डॉ. सपना जयस्वाल यांनी मांडले, तर आभार प्रा. भाग्यश्री साबळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, आणि विद्यार्थिनींचे योगदान महत्त्वाचे ठरले.

# न्यायालयाचा अवमान करून अतिक्रमण करणाऱ्या चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर । प्रतिनिधी**

बार्शी न्यायालयाने जैसे थे परिस्थिती ठेवा असा आदेश दिल्यानंतरही करमाळा नगरपालिकेच्या जागेत बेकायदेशीर पद्धतीने अतिक्रमण करून टपऱ्या टाकणाऱ्या चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुवा धनवे, सचिन गायकवाड, अजय खंडागळे, आणि शेखर हेरकर या व्यक्तींनी न्यायालयाचा आदेश डावलून अतिक्रमण केले. यावेळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी सचिन तपासे यांनी या कारवाईला विरोध केला असता त्यांना शासकीय कामात अडथळा आणण्यात आला. या प्रकरणी मुख्याधिकारी सचिन तपासे यांनी करमाळा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. संबंधितांवर भारतीय दंड संहितेच्या कलम १३२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# तुळसकर इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी आदरांजली



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विद्या विकास शिक्षण संस्था संचालित तुळसकर इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदरांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य राकेश साटोणे होते. बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. बीबीए, बीसीए आणि एमबीएच्या विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग आपल्या शब्दांत सादर केले.

अध्यक्षीय भाषणात राकेश साटोणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना प्रेरणा व मार्गदर्शन दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जयश्री वैद्य यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. श्रद्धा राऊत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे महत्त्वाचे सहकार्य लाभले.

# अखेर श्रीगोंद्यातील चांभूर्डी उखलगाव शिव रस्ता झाला खुला

## खुले होणारे शिव पानंद शेतरस्ते खऱ्या अर्थाने शेतऱ्यांच्या प्रगतीचा महामार्ग


**श्रीगोंदा । प्रतिनिधी**

श्रीगोंदा चांभूर्डी शिवरस्ता खुला झाल्यामुळे इतर गावांनाही त्याची प्रेरणा मिळेल शेतीला शेतरस्ता मिळाल्यास शेतकऱ्यांचा दळणवणाचा प्रश्न मिटेल शेतकऱ्यांनी शेतात मोठ्या कष्टाने पिकवलेला शेतमाला त्यांना बाजारात घेवून जाता येईल आपल समुद्ध शेतकऱ्यांच समृद्ध महाराष्ट्राच स्वप्न पुर्ण होईल नागरिकांनी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहून शेतकऱ्यांचा शेतरस्त्यासाठी चाललेला संघर्ष संपवण्यासाठी पुढाकार घ्यावा असे महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे शरद पवळे, दादासाहेब जंगले पाटील यांनी मत व्यक्त केले.

गेल्या अनेक वर्षांपासून चांभूर्डी उखलगाव शिवरस्ता बंद अनेक वर्षांच्या संघर्षानंतर हा रस्ता खुला झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे या रस्त्यामुळे शेतीसाठी लागणारी यंत्रसामुग्री शेतात घेवून जाता येईल शेतकऱ्यांच्या शेतीपुरक व्यवसायांमध्ये प्रगती होईल त्याचबरोर शेतकऱ्यांचा दळणवण्याचा प्रश्न सुटला असून खऱ्या अर्थाने प्रगतीचा महमार्ग खुला झाल्याचे शेतकऱ्यांना आज अनुवभवयास मिळत आहे यासंदर्भात श्रीगोंदा तहसीलदार डॉ.क्षितिजा वाघमारे मॅडम यांच्या मार्गदर्शन,सहकार्याने व शिव पानंद शेत रस्ते चळवळ महाराष्ट्र राज्य प्रणेते शरदराव पवळे / दादासाहेब जंगले पाटील राज्य समन्वयक यांच्या नेतृत्वाखाली श्रीगोंदा तालुका चळवळ कृती समिती प्रमुख राजेंद्र नागवडे ,अँड.कडूस पाटील, मेजर संतोष ढगे, परेशजी वाबळे साहेब रामचंद्र अडसरे गुरुजी, सुनील गायकवाड, जालिंदर कातोरे, गुरु गायकवाड, राजेंद्र उंडे मेजर पवार(लिंपणगाव) बापूराव जंगले व इतर सदस्यांच्या तहसील पाठपुराव्याने व संतोष ढगे मेजर साहेब यांच्या निस्वार्थ अथक परिश्रमानंतर चांभूर्डी व उखलगाव मोजणी हद्दी खुणा निश्चित करून ३३ फुटी रुंद दोन किलोमीटरचा पूर्ण रस्ता जेसीबी लावून अतिक्रमणमुक्त करण्यात आला यावेळी मोजणी अधिकारी एखंडे,महिला पोलिस नाईक सुरेखा वलवे,होमगार्ड जगताप, सर्कल भाऊसाहेब गिरीश गायकवाड तलाठी भाऊसाहेब सरोदे (माजी सैनिक), पोलीस प्रशासन अधिकारी यांचे खूप सहकार्य मिळाले यावेळी चांभूर्डी इतर शेतकरी उपस्थित होते सहकार्य केल्याबद्दल सर्व अधिकारी व ग्रामस्थ यांचे चळवळ कृती समिती श्रीगोंदा वतीने खूप आभार व्यक्त करण्यात आले रस्ता खुला होत असताना राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील व श्रीगोंदा शेतरस्ते कृती समितीचे प्रमुख राजेंद्र नागवडे,मेजर संतोष ढगे,सागर ढगे आदी उपस्थित होते यांसह प्रसारमाध्यमांचे महाराष्ट्र शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी आभार मानले.



# महायुतीकडून राष्ट्रवादीचे खासदार अमर कळे यांना जोरदार धक्का



**वर्धा । प्रतिनिधी**

कोणत्याही राजकीय पक्षाने सत्ता हस्तगत केल्यानंतर विरोधकांवर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न हा नवीन नाही. लोकसभा निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर अवघ्या चार महिन्यांत 'नॉट रिचेबल' ठरलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमर कळे यांच्या ताब्यातील संस्थेवर महायुती सरकारने वक्रदृष्टी टाकली आहे. यामुळे कारंजा बाजार उपसमिती, ज्यावर खासदार कळे गटाचे वर्चस्व होते, ती बरखास्त करण्यात आली असून जिल्हा उपनिबंधक यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### सत्ताप्राप्तीनंतरच्या हालचाली

सत्ताधारी पक्षाच्या या निर्णयामुळे राजकीय वातावरणात खळबळ माजली असून कारंजा बाजार समितीवरील प्रशासकीय हस्तक्षेपामुळे पुढील राजकीय हालचालींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### बाजार समितीच्या स्वायत्ततेचा संघर्ष

आष्टी बाजार समितीच्या उपशाखेप्रमाणे कारंजा बाजार समितीची स्थापना झाली होती. माजी आमदार दादाराव केचे यांनी दोन्ही बाजार समित्या स्वतंत्र ठेवण्याची मागणी बऱ्याच काळापासून केली होती. अखेर या मागणीला यश मिळाले आहे. कारंजा उपबाजार समितीत खासदार कळे गटाचे सभापतीसह १४ संचालक आणि भाजपाचे ३ संचालक होते. आता या संचालक मंडळाला बरखास्त करून प्रशासक नेमण्यात आला आहे. लवकरच कारंजा व आष्टी बाजार समित्या स्वतंत्रपणे काम सुरू करतील.

### महायुतीकडून दुसरा धक्का

१५ दिवसांपूर्वीच विधानसभा निवडणुकीत अमर कळे यांच्या पत्नी मयुरी कळे यांना पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर आता कारंजा बाजार समितीवरचे कळे गटाचे वर्चस्वही संपुष्टात आले आहे. महायुतीकडून खासदार अमर कळे यांना हा दुसरा मोठा धक्का मानला जात आहे.

# जिल्ह्यातील नागरिकांनी होमगार्ड बंधू-भगिनींना योग्य सहकार्य करावे-रघाताटे

## होमगार्ड व नागरी संरक्षण दलाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त मार्गदर्शन




**भंडारा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून होमगार्ड सैनिकही नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कार्यरत असतात. पावसाळा, हिवाळा, उन्हाळा यापैकी कोणताही ऋतू असो, जीवाची पर्वा न करता ते आपले कर्तव्य निभावतात. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी होमगार्ड बंधू-भगिनींना योग्य सहकार्य करावे, असे प्रतिपादन जिल्हा प्रशिक्षण केंद्र होमगार्ड भंडाऱ्याचे प्रभारी केंद्र नायक रवींद्र रघाताटे यांनी केले.

रवींद्र रघाताटे हे जिल्हा होमगार्ड व नागरी संरक्षण दलाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित रूट मार्चदरम्यान मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. रॅलीला हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ प्रशासकीय अधिकारी शैलेश शेडमाके आणि प्रभारी केंद्र नायक रवींद्र रघाताटे यांच्या हस्ते करण्यात आला. रूट मार्च जिल्हा कवायत कार्यालय मैदानापासून त्रिमूर्ती चौक, गांधी चौक, मुस्लिम लायब्ररी चौक मार्गे जिल्हा पोलीस मुख्यालय ग्राउंड येथे समाप्त झाला. कार्यक्रमादरम्यान शैलेश शेडमाके यांनी होमगार्ड संघटना ही जनतेची सेवा करण्यासाठी सदैव तत्पर असल्याचे मत व्यक्त केले. समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पलटन नायक रिजवान रशिद खान यांनी केले, तर प्रास्ताविक समादेशक अधिकारी महेंद्र नंदेश्वर यांनी केले. उपस्थितांचे आभार वरिष्ठ पलटन नायक मधू थोटे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पलटन नायक गणेश मस्के, शाह नवाज मिर्झा, शारदा शेंडे, भुषण ठवकर, स्नेहलता रंगारी, विक्की सेलोकर, वर्षा सेलोकर आणि इतर होमगार्ड सैनिकांचे सहकार्य लाभले. सर्व नागरिकांनी या उपक्रमांमध्ये जास्तीत जास्त सहभाग घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# महाराष्ट्र व अंबाजोगाई रुग्णालयातील बनावट औषध प्रकरण: शिवसेनेची कारवाईची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात तसेच अंबाजोगाई येथील स्वराती शासकीय रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा झाल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी शिवसेनेच्या जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते आणि गणेश वरेकर यांनी केली आहे.

शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, आणि जिल्हा शल्य चिकित्सक यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. निवेदनात त्यांनी रुग्णालयात ४० हजार तर राज्यभरात ८५ लाख बनावट औषधांचे वितरण झाल्याचा आरोप केला आहे.

याप्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याचे आवाहन करण्यात आले असून, आठ दिवसांत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# १५ डिसेंबरला मलकापूर येथे जनआक्रोश मोर्चा

## लाखोंच्या उपस्थितीचे आवाहन



**मलकापूर । प्रतिनिधी**

बांग्लादेशमध्ये हिंदू धर्मीयांवर होत असलेल्या अत्याचारांच्या निषेधार्थ आणि हिंदुत्वाच्या समर्थनार्थ मलकापूर येथे १५ डिसेंबर रोजी विशाल जनआक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चात जास्तीत जास्त लोकांनी सहभागी होऊन या आंदोलनाला आपलं पाठबळ द्यावं, असं आयोजकांकडून आवाहन करण्यात आले आहे. हिंदुत्वाच्या समर्थनासाठी उभारलेल्या या मोर्चात आपल्या सहभागाने एकजूट दाखवून या चळवळीला अधिक बळकटी मिळेल.

# जगदगुरु नरेंद्राचार्य महाराज यांचा समस्या व मार्गदर्शन सोहळा उत्साहात संपन्न

**जामखेड । प्रतिनिधी**

अनंत श्री विभूषित जगदगुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांचा ९ व १० डिसेंबर रोजी श्री क्षेत्र रामशेज उत्तर महाराष्ट्र उपपीठ नाशिक येथे भव्य समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला.

संपूर्ण उत्तर महाराष्ट्रातील भक्तगणांच्या वतीने विविध माध्यमातून सोहळ्याचा प्रचार प्रसार केला जात आहे. या सोहळ्याने केवळ आध्यात्मिक ज्ञानाचं मार्गदर्शन दिलं, तर सामाजिक कार्याचा महत्त्वाही सांगितला. दोन्ही दिवसांचा हा कार्यक्रम अत्यंत महत्वाचा असून, अधिकाधिक भाविकांनी या सोहळ्यात भाग घेऊन श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांचे मार्गदर्शन घेतले, असं आव्हान संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

९ डिसेंबर रोजी नवीन भक्तगणांना उपासक दीक्षा देण्यात आली, तर १० डिसेंबर रोजी जगदगुरु श्रींच्या पवित्र उपस्थितीत साधक दीक्षा देण्यात आली. त्याचप्रमाणे, तीन महिन्यांनंतर जगदगुरु श्रींचे नाशिकमध्ये आगमन होणार असून, त्याच्या आगमनाची सर्व भाविकांमध्ये उत्सुकता आहे. वाडी-वस्त्यांवरही या कार्यक्रमाचा मोठ्या प्रमाणात प्रचार करण्यात येत आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याचा लाभ घ्यावा, असं आव्हान उत्तर महाराष्ट्र उपपीठाच्या वतीने करण्यात आले आहे.




# दिव्यांग हे समाजाचे अविभाज्य घटक, त्यांना सर्वसामान्यांत मिसळून घ्या-अभिजीत खोत

**मोहोळ । प्रतिनिधी**

जन्मजात किंवा इतर कारणांमुळे दिव्यांग असलेली बालके हि समाजाची अविभाज्य घटक आहेत, आणि समाजाने त्यांना सर्वसामान्यांच्या वर्तुळात मिसळून घ्यायला हवे, असे आवाहन अपंग समावेशीत शिक्षणाचे मोहोळ तालुक्याचे प्रमुख अभिजीत खोत यांनी केले.

पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने गटशिक्षणाधिकारी अविचल महाडीक, शिक्षण विस्तार अधिकारी विकास यादव, बंडू शिंदे आणि मल्लिकार्जुन स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली समग्र शिक्षा अभियानांतर्गत जागतिक दिव्यांग दिन आणि दिव्यांग जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. यानिमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखली (ता. मोहोळ) येथे आयोजित कार्यक्रमात अभिजीत खोत बोलत होते. या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांमध्ये विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यशस्वी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य बक्षीस म्हणून देण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रारंभात मुख्याध्यापक विष्णू दाढे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तसेच, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अपंग विषय तज्ञ अभिजीत खोत, धनाजी शितोळे, सुहास जाधव, परमेश्वर पाटील, तुषार पाटील, अरविंद गोडसे यांनी दोन्ही गटांमध्ये मुला-मुलींच्या संगीत खुर्ची, चित्रकला, धावणे, सांस्कृतिक स्पर्धा घेतल्या.

कार्यक्रमात विष्णू दाढे, राजेंद्र बनसोडे, मालन चेंडगे, रवी चव्हाण, अर्चना घुगे, दादा सरक यांच्यासह शिक्षक उपस्थित होते

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रश्नमंजुषा कार्यक्रम संपन्न

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बाबासाहेब डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिणाम निर्वाण दिनानिमित्त बाबुपेठ परिसरातील विविध बुद्ध विहारांमध्ये बाबासाहेब प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सुपट्टीपन्नो बहुउद्देशीय बौद्ध मंडळ, तथागत बुद्ध विहार, सिद्धार्थ नगर बुद्ध विहार, तक्षशिला बुद्ध विहार, सम्राट अशोक बुद्ध विहार, बोधिसत्व बुद्ध विहार, सम्राट बुद्ध विहार, सांगायन बुद्ध विहार, पंचशील बुद्ध विहार आणि श्रावस्ती बुद्ध विहार अशा १० बुद्ध विहारांमध्ये हा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमात एकूण ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यांना राजू अडकिने, संचालक हायटेक इन्स्टिट्यूट बाबूपेठ यांच्या वतीने पहिले, दुसरे आणि तिसरे पारितोषिक देण्यात आले. तसेच, प्रत्येक विद्यार्थ्यांना हायटेक इन्स्टिट्यूटमार्फत वेटिंग फॉर विजा हे बाबासाहेब लिखित ज्ञानवर्धक पुस्तक भेट म्हणून देण्यात आले. कार्यक्रमात प्रमुख सहकार्य म्हणून गौतम नगराळे, महादेव निखाडे, विजया भगत, ज्योती निमसटकर यांची उपस्थिती होती.



# ऐतिहासिक निर्णयांचा धडाका लावणारा हेविवेट नेता

## सुधीर मुनगंटीवार म्हणजे धडधडती तोफ

**मुल । प्रतिनिधी**

'चमत्काराशिवाय नमस्कार नाही पराक्रमावाचून पोवाडा नाही' अशी म्हण प्रचलित आहे. इतरांना अशक्य वाटणाऱ्या गोष्टी जिद्दीने शक्य करून दाखविणाऱ्याची कामगिरी एखाद्या चमत्कारासारखी असते. असा पराक्रम करणाऱ्याचेच पोवाडे गायले जातात. राज्याचे भाजपाचे हेविवेट नेते धडधडती तोफ म्हणून ज्यांची ओळख आहे अशा सुधीर मुनगंटीवारांनी ऐतिसाहिक निर्णयांचा धडाका लावत आपली कारकीर्द गाजवली आहे. या हेविवेट नेत्याने दुर्लक्षित खात्यांना जीवनदान दिले. पहिले ग्राहक संरक्षण आता वन,सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय.

राज्याच्या या नेत्याकडे 'नाही' हा शब्द डिक्शनरीत शोधून सापडणार नाही, अशा नेत्यांमध्ये सुधीर मुनगंटीवार यांचा आवर्जून उल्लेख होतो. नकारघंटा वाजवण्यापेक्षा आपल्याकडे येणाऱ्याला मदत कशी होईल, त्याची समस्या कशी सुटेल याचा प्रामाणिक प्रयत्न मुनगंटीवार करतात. अडिच दशकांपूर्वी राज्यात युतीचे सरकार असताना ते पहिल्यांदा मंत्री झाले. त्यावेळी ग्राहक संरक्षण व पर्यटन मंत्री म्हणून त्यांनी केलेली कामगिरी महाराष्ट्राने बघितली आहे. त्यावेळी देखील ग्राहक संरक्षण खाते दुर्लक्षित होते. पण मुनगंटीवार यांनी या खात्याने नवसंजीवनी दिली.

२०१४ मध्ये राज्यात भाजप-शिवसेना युतीचे सरकार आले. मुनगंटीवार यांच्याकडे अर्थ सोबतच वन खात्याची जबाबदारी आली. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदा स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राला ११९७५ कोटींचं सरप्लस बजेट देणारे ते एकमेव नेते ठरले. 'बेस्ट फायनान्स मिनिस्टर' म्हणून तत्कालीन केंद्रीय मंत्री दिवंगत अरुण जेटली यांच्या हस्ते मुनगंटीवार यांना गौरविण्यात आले. केवळ 'झाडे लावा झाडे जगवा' अशी घोषणा देऊन मुनगंटीवार थांबले नाहीत. त्यांनी अख्ख्या महाराष्ट्रात ५० कोटी वृक्ष लागवडीची मोहीम राबवली. गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड आणि लिम्का बुकने त्याची नोंद घेतली. विशेष म्हणजे पर्यावरण संवर्धन म्हणजे काय, हे प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी दाखवून दिले.

२०२२ मध्ये राज्यात महायुतीचे सरकार आले. मुनगंटीवार यांच्याकडे वने, सांस्कृतिक आणि मत्स्यव्यवसाय खाते सोपवण्यात आले. सांस्कृतिक खात्याला फक्त नाट्य स्पर्धा आणि कलावंतांच्या मानधनापुरता महत्त्व होते. फारतर सांस्कृतिक पुरस्कारांमधून होणाऱ्या मनोरंजनाच्या दृष्टीने बघितले जायचे. पण मुनगंटीवार यांनी सांस्कृतिक खात्यामध्ये जीव ओतला. त्याला सर्वसमावेशक केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ३५०व्या वर्षानिमित्त त्यांनी आयोजित केलेल्या उपक्रमांमधून त्याची प्रचिती आली.



### खऱ्या अर्थाने सांस्कृतिक 'कार्य'

**याच खात्याच्या माध्यमातून मुनगंटीवार यांनी लंडन येथून छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखं भारतात आणली. अफजलखानाच्या कबरीचे अतिक्रमण हटवले. खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात सांस्कृतिक 'कार्य' करणारा नेता म्हणून त्यांची महाराष्ट्राला नव्याने ओळख झाली. मत्स्यव्यवसाय खाते तर जवळपास कुणालाही माहिती नव्हते पण मुनगंटीवार यांनी या खात्यातून महाराष्ट्रातील मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्यांना, मासेमारीवर पोट भरणाऱ्यांना दिलासा दिला. अनेक योजना आणत मत्स्यव्यवसाय बांधवांसाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले.**

### म्हणूनच शंभर टक्के यश

**'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे' या म्हणीची प्रचिती सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या कृतीमधून वारंवार दिली आहे. यश आणि अपयशाची चिंता न करता प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे, असं ते म्हणत असतात. कमालीची सकारात्मकता, तत्परता आणि पाठपुरावा या त्रिसूत्रीवर ते काम करतात. म्हणूनच ते शंभर टक्के यशस्वी देखील होतात.**

# मलकापूरमध्ये नायलॉन मांजाची खुलेआम विक्री,कठोर कारवाईची मागणी

**मलकापूर । प्रतिनिधी**

मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर मलकापूर शहरात नायलॉन मांजाची खुलेआम विक्री होत असल्याचे चित्र दिसत आहे. हा मांजा पर्यावरण, पक्षी आणि मानवांसाठी अत्यंत घातक ठरतो. त्यामुळे विक्रेत्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

नायलॉन मांजामुळे पतंग उडवण्याचा आनंद जरी मिळत असला, तरी यामुळे अनेक पक्षी गंभीर जखमी होतात, तसेच मानवी जीवितालाही धोका निर्माण होतो. मांजा लोकांच्या गळ्याला अडकून गंभीर अपघात होण्याच्या घटनाही वारंवार घडतात.

मलकापूर शहरात नायलॉन मांजाची विक्री खुलेआम सुरू असून, पोलीस प्रशासनाने यावर नियंत्रण आणून तातडीने कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. विक्रेत्यांना फक्त समज देऊन थांबणे योग्य नाही; त्याऐवजी कायद्याचा धाक दाखवून कारवाई करावी, अशी मागणी सामान्य जनतेने केली आहे. सणांच्या काळात अशा घातक वस्तूंचा वापर थांबवण्यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलून कठोर उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.



# हंसराज अहीर यांच्या उपस्थितीत वेकोलि मुख्यालयात बैठक

**नागपूर । प्रतिनिधी**

नागपूर येथील वेकोलि मुख्यालयात राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांच्या अध्यक्षतेखाली वेकोलि प्रबंधनाशी संबंधित विविध मुद्द्यांवर बैठक पार पडली. यामध्ये कोळसा चोरी थांबविण्यासाठी ड्रोनचा वापर करण्याची शिफारस करण्यात आली. तसेच, कोल इंडियाच्या एसओपीमध्ये शैक्षणिक पात्रतेनुसार नियुक्त्या देण्याचे प्रावधान करण्याचे निर्देश अहीर यांनी दिले. वयोमर्यादा ३५ वर्षांवरून ४० वर्षे करण्याचीही सूचना करण्यात आली. ओबी कंपनीत स्थानिकांना रोजगार देण्यास महाराष्ट्र शासनाच्या ८०:२० जीआरचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीत विविध प्रकल्पांच्या जमिनींच्या अधिग्रहण प्रक्रियेला गती देण्याचे आणि स्थानिक शेतकऱ्यांना न्याय देण्याचे निर्णय घेण्यात आले.




# भंडारा येथे आरोग्य शिबीर १४० रुग्णांची तपासणी

**भंडारा । प्रतिनिधी**

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत भंडारा शहरात एक भव्य आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने डॉ. सुबोध थोटे (तालुका आरोग्य अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली रमाबाई आंबेडकर वार्डातील बुद्ध विहारात हे शिबीर संपन्न झाले.

शिबिराचे उद्घाटन प्राचार्य अर्जुन गोडबोले यांच्या हस्ते झाले. यावेळी तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करण्यात आले. शिबिराच्या अध्यक्षस्थानी डॉ. लक्ष्मी सोनटक्के होत्या. या शिबिरात शुगर, कुष्ठरोग, क्षयरोग, उच्च रक्तदाब, थायरॉइड, सिक्यल सेल, मुख तपासणी आणि जनरल तपासणी करण्यात आली. नागरिकांना आहारविषयक सल्ला दिला गेला तसेच अवयवदानाबद्दल जागरूकता निर्माण करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आरोग्य केंद्रातील कर्मचारी, एलएचव्ही नर्स कर्मचारी आणि स्थानिक समाजसेवकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. संपूर्ण शिबिराचे संचालन रोहित वाघ यांनी केले, तर आभार प्रदर्शन रिता गोंडाने (स्टाफ नर्स) यांनी केले. या शिबिरात एकूण १४० रुग्णांची तपासणी करण्यात आली. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून भविष्यात असे शिबीर नियमितपणे आयोजित करण्याची मागणी केली आहे.



# सोयाबीन खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणीची अंतिम मुदत १५ डिसेंबर



**वर्धा । प्रतिनिधी**

हंगाम २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरावर सोयाबीन खरेदीसाठी नाफेडच्या वतीने ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शेतकऱ्यांसाठी नोंदणीची अंतिम तारीख १५ डिसेंबर २०२४ असून, खरेदी प्रक्रिया १२ जानेवारी २०२५ पर्यंत सुरू राहील.जिल्हा पणन अधिकारी बि. वाय. शेख यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, लवकरात लवकर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून, आपला सोयाबीन खरेदी केंद्रांवर जमा करावा.

आतापर्यंत जिल्ह्यात ४,२४२ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे आणि १९,१९८ क्विंटल सोयाबीन खरेदी झाली आहे. १,०३१ शेतकऱ्यांनी आपला माल खरेदी केंद्रांवर जमा केला आहे.आधारभूत दरानुसार माल विक्रीसाठी ही योजना शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या फायदेशीर ठरणार आहे. शेतकऱ्यांनी नोंदणी करून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वर्ध्यात बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचारा विरोधात भव्य आक्रोश मोर्चा आणि जाहीर सभा








**वर्धा । प्रतिनिधी**

बांगलादेशातील हिंदू, बौद्ध आणि शिख समुदायावर होणाऱ्या अत्याचारांच्या निषेधार्थ वर्ध्यात मंगळवारी सकल हिंदू समाजाच्या नेतृत्वाखाली भव्य आक्रोश मोर्चा आणि जाहीर सभा आयोजित करण्यात आली. रामनगर सर्कस मैदान येथून सुरू झालेला मोर्चा शहरातील विविध भागातून मार्गक्रमण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात समाप्त झाला. राष्ट्रपती आणि पंतप्रधानांना अत्याचार थांबवण्यासाठी तातडीच्या कारवाईसाठी निवेदन देण्यात आले.

**जिहादी कट्टरपंथीयांविरोधात आंतरराष्ट्रीय कारवाईची मागणी**

निवेदनात बांगलादेशातील हिंदू, बौद्ध आणि शिख समाजावरील सातत्याच्या हल्ल्यांविरोधात कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. २०० हून अधिक हल्ल्यांमध्ये ३५० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. इस्कॉन साधू चिन्मय कृष्णदास यांची मुक्तता, हिंदू मंदिरांना सुरक्षा, आणि या विषयावर आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**जाहीर सभेत हिंदू समाजाच्या एकतेचा निर्धार**

रामनगर मैदानावर सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित जाहीर सभेत प्रखर हिंदुत्त्ववादी वक्ते व नागपूरचे माजी महापौर दयाशंकर तिवारी यांनी भारताच्या विभाजनाच्या ऐतिहासिक घटना, बांगलादेश निर्मितीचे महत्त्व, आणि हिंदू समाजाच्या एकतेची गरज यावर भाष्य केले. ते म्हणाले, आता हिंदूंनी एकत्र येऊन बांगलादेशातील हिंदूंच्या हक्कांसाठी आवाज उठवण्याची वेळ आली आहे. त्यांनी बांगलादेशातील अत्याचार थांबवण्यासाठी दबाव निर्माण करण्याचे आवाहन केले.सभेला रा. स्व. संघाचे जिल्हा संघचालक जेठानंद राजपूत, नगर संघचालक डॉ. प्रसाद देशमुख, संत सयाजी महाराज, भन्ते राजरत्न,धर्मेंद्र मुंदडा, आणि अन्य हिंदुत्ववादी संघटनांचे प्रमुख नेते उपस्थित होते.सर्कस मैदान ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकपर्यंत मोर्चात संत-महंत, महिलावर्ग, युवक आणि इस्कॉनच्या रथासह जवळपास ६ हजार लोकांनी सहभाग घेतला. वर्ध्याच्या व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने बाजारपेठ बंद ठेवून पाठिंबा दर्शवला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात राष्ट्रगीताने आणि इस्कॉन धर्मप्रचारकांच्या फुगडीने मोर्चाचा समारोप झाला. या आंदोलनाने हिंदू समाजाच्या संघटनशीलतेसह अन्यायाविरोधातील दृढ निर्धाराचा संदेश दिला.कार्यक्रमाचे संचालन अर्चना वानखेडे आणि श्रेया देशमुख यांनी केले. माजी खासदार रामदास तडस,सुरेश वाघमारे,सुधीर दिवे आमदार डॉ. पंकज भोयर, राजेश बकाने, समिर कुणावार, सुमित वानखेडे आणि इतर महत्त्वाचे नेते या सभेला उपस्थित होते.

# विदर्भातील हिरवी मिरची दुबईच्या बाजारपेठेत,शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी

**नागपूर । राहूल मून**

विदर्भातील शेतीमाल आता आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश करत असून, यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक लाभ होण्यास सुरुवात झाली आहे. ओमानला संत्री निर्यात केल्यानंतर, नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी रविवारी १४ टन हिरवी मिरची थेट दुबईच्या बाजारपेठेत निर्यात केली आहे.दुबईला पाठवण्यात आलेल्या मिरचीचे वाण 'गौरी' असून, या वाणाची दुबईत मोठ्या प्रमाणात मागणी आहे. हिरव्या मिरचीचे दरही चांगले मिळत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होणार आहे.विदर्भातील शेतमाल निर्यातीसाठी केंद्र व राज्य सरकारच्या प्रयत्नांना यश येत आहे. 'महाऑरेंज'च्या सहकार्याने फळांवर कोटिंग आणि शीतगृह सुविधांची उपलब्धता करण्यात आली आहे. वर्धा जिल्ह्यातील कारंजा आणि अमरावती जिल्ह्यातील मोर्शी येथे शीतगृह केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.हिरव्या मिरचीच्या निर्यातीसाठी बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत शेतकऱ्यांना प्रोत्साहन आणि प्रशिक्षण देण्यात आले. नागपूर जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांनी पुढाकार घेत या प्रक्रियेत सहभाग घेतला.हिरवी मिरची निर्यातीच्या निमित्ताने आयोजित छोटेखानी कार्यक्रमात महाऑरेंजचे संचालक श्रीधर ठाकरे, आत्माच्या प्रकल्प संचालक डॉ. अर्चना कडू, पणन मंडळाचे विभागीय सहसंचालक अजय कडू, स्मार्ट प्रकल्पाच्या नोडल अधिकारी पल्लवी तलमले, पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ स्वाती गावंडे, आणि युनिव्हर्स एक्सपोर्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण वानखेडे उपस्थित होते.विदर्भातील शेतकऱ्यांच्या मेहनतीला जागतिक बाजारपेठेत मान्यता मिळाल्यामुळे भविष्यात अशा उपक्रमांमधून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे.



### दुबईतील प्रमुख बाजारपेठेत विक्री

**ही हिरवी मिरची दुबईतील 'अवर वेलनेस विलेज' आणि 'टायटन' या प्रमुख बाजारपेठांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईल. यासाठी राज्याचे पणन मंडळ आणि 'महाऑरेंज' यांचे मोलाचे सहकार्य लाभले.**

### शेतकऱ्यांच्या भविष्याला नवा मार्ग

**विदर्भातील हिरवी मिरची दुबईला निर्यात केल्यामुळे शेतकऱ्यांसाठी नवी संधी निर्माण झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील यशस्वी प्रवेशामुळे विदर्भातील इतर शेतीमालासाठीही निर्यात वाढवण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

# परसोडा येथील सुभाष बोधाने यांच्या पत्नीला मिळाला विम्याचा लाभ

## पॉलिसी घेतल्यानंतर अवघ्या महिन्यातच मृत्यू, विमा कंपनीकडून लाभ मंजूर

**वरोरा । प्रतिनिधी**

सुभाष बोधाने यांनी भारतीय जीवन विमा निगमच्या वरोरा शाखेतून एक लाख रुपयांची पॉलिसी घेतली होती. परंतु दुर्दैवाने, पॉलिसी काढल्यानंतर अवघ्या एका महिन्यातच त्यांचा अल्पशा आजाराने मृत्यू झाला. त्यांच्या पत्नीने विमा दावा केला आणि नुकताच त्यांना मृत्यू दाव्याचा लाभ मंजूर झाला.

सुभाष बोधाने यांनी २६ मार्च २०२४ रोजी वार्षिक ६४३६ रुपयांच्या प्रीमियमवर ही पॉलिसी घेतली होती. त्यांच्या निधनानंतर शारदा प्रमोद नागापुरे (झेड एम क्लब मेंबर, चऊढ-णड-) यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भारतीय जीवन विमा निगमच्या वरिष्ठ शाखा प्रबंधक मोहन गोगुलवार, उपशाखा प्रबंधक सेल्स सुनील बिजवे, आणि



विकास अधिकारी सचिन उघडे यांच्या सहकार्याने मृत्यू दावा मंजूर करण्यात आला.क्लेम प्रक्रियेत सुभाष यांच्या पत्नी अश्विनी बोधाने यांनी सौ. शारदा नागापुरे यांच्या मेहनतीचे कौतुक केले. त्यांना १,०३,८०० रुपयांचा विमा लाभ मिळाला. दाव्याच्या मंजुरीच्या वेळी ग्रामपंचायत परसोडाचे उपसरपंच रमेश पावडे उपस्थित होते.विमा पॉलिसीमुळे मृतकाच्या कुटुंबाला आर्थिक सहाय्य मिळाल्याने ते जीवनातल्या संकटांचा सामना अधिक निर्धाराने करू शकतील, असे मत व्यक्त करण्यात आले.

### ग्राहकांसाठी तत्पर सेवा

**शारदा नागापुरे यांनी मृत्यू दावा मंजूर होण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या तत्पर सेवेचे मृतकाच्या कुटुंबियांनी कौतुक केले आहे. विम्याच्या महत्त्वाची जाणीव आणि यामुळे कुटुंबाला मिळणारा आधार याबाबतही उपस्थितांनी विचार मांडले.**

# राहुल भगत यांचा क्रिकेटचे उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून चंदिगड येथे सन्मानित




**उमरखेड । प्रतिनिधी**

येथील क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक राहुल भगत यांना पंजाब राज्यातील चंदिगड शहरात क्रिकेटच्या उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. पंजाबमधील चंदिगड शहरात १९ वर्ष वयोगटातील मुलांसाठी ४६ वी ऑल इंडिया शहिद भगतसिंग क्रिकेट चॅम्पियन्स स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत राहुल भगत यांनी ज्या संघासाठी प्रशिक्षक म्हणून काम केले, त्या संघाने सर्व सामने जिंकत प्रतिष्ठेची चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. राहुल भगत यांना त्यांच्या मेहनतीचे फळ म्हणून ही सन्मानाची ट्रॉफी मिळाली आहे. महागाव तालुक्यातील फुलसावंगी येथील लहानश्या गावातील खेळाडूंना प्रोत्साहन देत, क्रिकेटचे धडे देऊन उत्तम कौशल्य शिकवणाऱ्या राहुल भगत यांना पंजाब राज्यातील मंत्री महोदय यांच्या हस्ते उत्कृष्ट कोच म्हणून सन्मानित केले आहे.

या यशाबद्दल राहुल भगत यांचे महागाव, फुलसावंगी आणि तालुक्यातून कौतुक करण्यात येत आहे.

# ध्वजदिन निधीचे विक्रमी संकलन करत अहिल्यानगरचा राज्यात प्रथम क्रमांक

## राजभवन येथील समारंभात राज्यपालांच्या हस्ते जिल्ह्याचा सन्मान

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्याने ध्वजदिन निधीचे विक्रमी संकलन करत राज्यात प्रथम क्रमांकाची कामगिरी केल्याने राजभवन येथे आयोजित सेना दिवस कार्यक्रमात राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन जिल्ह्याचा सन्मान करण्यात आला. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्यावतीने जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्क्वॉड्रन लिडर वि.ल. कोरडे (निवृत्त) यांनी हा पुरस्कार स्विकारला. भारतीय सैन्यदल हे आपल्या देशाचा अभिमान असून देशाच्या संरक्षणाबरोबरच नैसर्गिक आपत्तींच्या काळातही आपले सैन्यदल अत्यंत अमूल्य सेवा बजावते. भारताच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राण अर्पण केले अशा जवानांच्या कुटुंबीयांच्या जीवनातील अडीअडचणी दूर करून त्यांचे जीवन सुसह्य होण्यासाठी, युद्धात अपंगत्व तसेच सेवा निवृत्त झालेल्या जवानांच्या पुर्नवसनाकरिता सशस्त्र सेना ध्वज निधीला सर्वांनी जास्तीत जास्त योगदान देण्याचे अवाहन श्री. सालीमठ यांनी गतवर्षी केले होते. त्याला जिल्ह्यातील विविध शासकीय विभाग, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.



जिल्ह्यातील सर्व शासकीय-निमशासकीय कार्यालये, महामंडळे, सहकारी संस्था, धार्मीक संस्था, कृषी विद्यापीठ, राज्य परिवहन महामंडळ आणि नागरिकांनी ५ कोटीहून अधिक ध्वजदिन निधी संकलन करण्यात भरीव योगदान दिले. यात शिर्डी साई संस्थान, जिल्हा परिषद, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, महानगरपालिका, नगरपालिका आणि पोलीस विभागाने सर्वाधिक योगदान आहे. अहिल्यानगर जिल्ह्याने रु. १ कोटी ८४ लाख ९८ हजार उद्दिष्ट असतांना रु. ५ कोटी ८ लाख ६८ हजार ३०८ एवढा अर्थात २७५ टक्के निधी संकलित केला. लातूर ४२ लाख २२ हजार उद्दिष्ट असतांना ९७ लाख, नागपूर १ कोटी ९१ लाख ९८ हजार उद्दिष्ट असतांना ३ कोटी ९ लाख ७७ हजार, अमरावती १ कोटी १० लाख उद्दिष्ट असतांना १ कोटी ३८ लाख ८० हजार आणि कोल्हापूर जिल्ह्याने रु.१ कोटी ६० लाख ७९ हजार उद्दिष्ट असतांना रु.२ कोटी एवढा निधी संकलित केला आहे. अहिल्यानगर जिल्ह्याची कामगिरी सर्वोत्तम ठरली आहे. या कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी सालीमठ यांनी जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी,कर्मचारी आणि नागरिकांना धन्यवाद देत त्यांचे अभिनंदन केले आहे.

# बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेच्या अटी व निकष शिथिल करणार; जीआरची अंमलबजावणी आठवड्यात होणार

## मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या सततच्या पाठपुराव्याला यश;मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

'आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजने'चे निकष शिथिल करण्याचा निर्णय तसेच दरमहा २० हजार रुपये सन्मान निधी देण्याच्या शासन निर्णयावर येत्या आठवड्यात कार्यवाही करण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर प्रथेप्रमाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंत्रालयातील पत्रकार कक्षात येऊन पत्रकार परिषद संबोधित केली. यावेळी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली. या कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी आवर्जून हा मुद्दा उपस्थित केला. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाच्या ९ मे २०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात सन्मान निधी वाढविण्याची



घोषणा केली होती. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी मार्च २०२४ मध्ये राज्य सरकारने राज्यातील निवृत्त पत्रकारांना देण्यात येणाऱ्या सन्माननिधी योजनेची दरमहा देण्यात येणारी रक्कम रुपये ११ हजारांऐवजी २० हजार रुपये करण्याचा शासन निर्णय (जीआर) जारी केला. मात्र त्याची अजूनही अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे अध्यक्ष डोईफोडे यांनी निदर्शनास आणले. महायुती सरकारने लाडक्या बहिणींचा सन्मान केला तसा सन्मान राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांचा करून त्यांनाही दिलासा द्यावा, अशी मागणी डोईफोडे यांनी केली.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान निधीचे निकष शिथिल करण्याचा निर्णय तसेच २० हजार रुपये दरमहा सन्माननिधी देण्यासंदर्भात जारी केलेल्या शासन निर्णयावर येत्या आठवड्यात कार्यवाही केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेल्या या घोषणेमुळे राज्यातील अनेक ज्येष्ठ पत्रकारांना याचा फायदा होणार आहे. सन्मान निधीत वाढ करून ते ११ हजाराऐवजी २० हजार रुपये करण्यात यावे तसेच शासन निर्णयांची अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाने पाठपुरावा केला होता. संघाच्या सततच्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. यावेळी सरचिटणीस प्रविण पुरो, कोषाध्यक्ष विनोद यादव, कार्यकारिणी सदस्य खंडूराज गायकवाड, भगवान परब, अलोक देशपांडे, मनोज मोघे यांच्यासह मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.

## लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी ही केवळ अफवा

# अर्थसंकल्पापर्यंत लाभ मिळत राहणार; त्यानंतर २१०० रुपये देणार, आदिती तटकरेंचा दावा



**मुंबई (वृत्तसंस्था)**

लाडकी बहिण योजनेच्या अर्जाची छाननी करण्याचा कोणताही निर्णय झालेला नसल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदार आदिती तटकरे यांनी म्हटले आहे. मी या खात्याची मंत्री असेपर्यंत असा कोणताही निर्णय झाला नसल्याचे त्या म्हणाल्या. तशा काही तक्रारी आल्या तर सरकार पुढील निर्णय घेईल. पण अद्याप तशा तक्रारी दाखल झालेल्या नसल्याचा दावा देखील तटकरे यांनी केला आहे.

लाडकी बहीण योजनेच्या अर्जाची छाननी करून त्यातील महिलांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप विरोधकांच्याकडून केला जात आहे. मात्र यावर आदिती तटकरे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. लाडकी बहिण योजनेचा जीआर काढला त्यावेळी त्यात काही नियम दिले गेले होते. त्या नियमानुसारच सर्व महिलांना योजनेचा लाभ देण्यात आला असल्याचा दावा आदिती तटकरे यांनी केला आहे. सर्व निकषांमध्ये बसणाऱ्या महिलांनाच लाडकी बहिण योजनेचे पैसे देण्यात आले असल्याचा दावा देखील त्यांनी केला.लाडक्या बहिणी संदर्भात नियम बदलले जाणार असल्याच्या अफवा पसरवल्या जात असल्याचे देखील तटकरे यांनी म्हटले आहे. एका घरातल्या केवळ दोन महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ दिला जाईल, अशा प्रकारचा कोणताच नियम नसल्याचे देखील तटकरे यांनी म्हटले आहे. राज्यांमध्ये अडीच कोटी पर्यंत लाभार्थी असू शकतात, असे आम्ही सुरुवातीपासून म्हटले होते. सध्या दोन कोटी ३४ लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळत असल्याचा दावा तटकरे यांनी केला आहे. त्यामुळे आपण त्या आकड्याच्या जवळपासच असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे.पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशनात महिलांना २१०० रुपयांचा लाभ देण्याचे महायुतीने कबूल केलेले आहे. त्यानुसार अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्याची घोषणा करणार असल्याचे देखील तटकरे यांनी सांगितले आहे. सध्या ज्या महिलांना लाभ मिळत आहे, तो पढील अर्थसंकल्पापर्यंत तसाच मिळत राहणार असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे.